शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

प्रेरणास्थान

मा. श्री. रोहन घुगे (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, ठाणे

मा. श्री.बाळासाहेब राक्षे
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, ठाणे

मा. श्रीम. ललिता दहितुले
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, ठाणे

मा. श्रीम.भावना राजनोर
शिक्षणाधिकारी (योजना)
जिल्हा परिषद, ठाणे

मा. श्रीम.पल्लवी सस्ते
गटविकास अधिकारी
पंचायत समिती कल्याण

संकल्पना, निर्मिती व संपादन

डॉ. रुपाली खोमणे
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कल्याण

डॉ.सुनीता बेडसे
प्राथ. शिक्षिका, जि.प.शाळा कोळीब



श्रीम.मनिषा कोरडे
प्राथ. शिक्षिका, जि.प.शाळा घोटसई

१

## जून २०२४

## दैनंदिन उपक्रम -इ.३री
शैक्षणिक वर्ष २०२४-२५

वैशाख/ज्येष्ठ शके १९४६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | ३० तुला जे आवडेल ते कर. | २ खूप गरम होतंय ना! शोध बरे एवढे का उकडत असावे | ९ एका मिनिटात जास्तीत जास्त किती उड्या मारशील ? मोज बघू | फादर्स डे  १६ वडीलांसाठी भेटकार्ड बनव व तुझे वडील तुझ्यासाठी काय काय करतात ते दहा ओळीत लिही. | २३ आईला भाजी निवडण्यास मदत कर, आणि भाजी बद्दल पाच वाक्ये लिही |
| सो सोमवार | | ३ शेवटी 'ए' अक्षर येणारे १० शब्द शोधून लिही. उदा.Come | जागतिक दृष्टीदान दिन  १० दृष्टी चांगली रहावी म्हणून आपण कोणती काळजी घेऊ शकतो ? | राजमाता जिजाऊ स्मृतीदिन बकरी ईद  १७ स्मृतीदिन या शब्दाचा अर्थ शोध. | २४ चांदणी कशी काढतात त्याचा सराव कर. |
| मं मंगळवार | | ४ आऽहऽह....! पाऊस आला का? परिसराचे निरीक्षण कर पाहू. | ११ शाळा लवकर उघडली तर... काय होईल ते लिही. | १८ शाळेतील शिक्षकांची पूर्ण नावे विचारुन लिही. | २५ तुला जे आवडेल ते कर. |
| बु बुधवार | | जागतिक पर्यावरण दिन  ५ दोन झाडे लावून त्यांचे संवर्धन कर | १२ शाळा, पावसाळा असे शेवटी 'ळा' येणारे शब्द जास्तीत जास्त लिही. | १९ विविध भौमितिक आकार एकमेकांत काढून रंगव. | राजर्षी शाहू महाराज जयंती  २६ राजर्षी या शब्दाचा अर्थ शोधून सांग. |
| गु गुरुवार | | शिवराज्याभिषेक सोहळा  ६ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आजी-आजोबांकडून जाणून घे व मित्रांसोबत चर्चा कर. | १३ तुझ्या गावात कोण-कोणती दुकाने आहेत ते घरी आईला विचार | २० आज आकाशात चंद्राच्या आकाराचे निरीक्षण कर. | २७ महान व्यक्तींच्या नावापुढे पदवीने संबोधले जाते. कोणाला कोणत्या नावाने संबोधतात हे शोधून लिही. |
| शु शुक्रवार | | ७ पाऊस पडला नाही तर...! काय होईल ते लिही. | १४ तुझे सगळे मित्र शाळेत जातात ना? नसतील जात तर गुरुजींना नावे लिहून देशील. | जागतिक योग दिन वटपौर्णिमा  २१ योग दिवस २१ जूनला का साजरा करतात त्याची माहिती शिक्षकांकडून घेऊन लिही. | २८ शाळेचा पहिला दिवस आठव आणि ५ वाक्ये लिही. वर्गात वाचून दाखव. |
| श शनिवार | १ गोष्टीचे पुस्तक वाचून काय समजले यावर विचार कर. | ८ तू पावसाची वाट आतुरतेने का पाहत आहेस ? ५ वाक्ये लिही. | १५ स्वत:चा परिचय दे. (नांव/पत्ता/शाळा/इयत्ता/छंद) आणि सर्व वह्या-पुस्तकांना कव्हर घाल. | कर्नाटकी बेंदूर २२ शाळा या शब्दापासून १५ मिनिटात जास्तीत जास्त वाक्ये बनव. | २९ पाच वेळा दीर्घ श्वास घे आणि सोड. |

### शुभेच्छुक

श्रीम. सुनिता मोटघरे
अधिक्षक, शा.पो.आ.

श्रीम.विद्या नाईकवाडी
विस्तार अधिकारी, शिक्षण

श्री.दादू कोकाटे
विस्तार अधिकारी, शिक्षण

श्रीम.प्रियंका सुतार
केंद्रप्रमुख, गुरवली

श्री.दिनानाथ दुधसागरे
केंद्रप्रमुख, गोवेली

श्रीम.विभावरी राणे
प्र.केंद्रप्रमुख, म्हारळ

श्री.हर्षद खंबायत
प्र.केंद्रप्रमुख, सोनारपाडा

श्री.अनंत केदार
प्र.केंद्रप्रमुख, मामणोली

श्री.अरविंद मोरे
प्र.केंद्रप्रमुख, दहिसर

शिक्षण व समग्र विभाग,
पंचायत समिती, कल्याण

आनंद-तरंग दिनदर्शिका डाऊनलोड करण्यासाठी खालील QR Code स्कॅन करा.

ISBN No. : 978-81-973418-6-1

संकल्पना चित्रे व माहिती आंतरजालावरुन साभार.



## राजर्षी शाहु महाराज

मूळ नाव :- यशवंत जयसिंगराव (आप्पासाहेब) घाटगे
प्रसिद्ध नाव :- राजर्षी शाहु महाराज
जन्म :- २६ जून १८७४
दत्तक विधान :- १७ मार्च १८८४
जन्म ठिकाण :- कागल, कोल्हापूर, महाराष्ट्र
वडील :- आबासाहेब घाटगे
आई :- राधाबाई
पत्नी :- महाराणी लक्ष्मीबाई भोसले
मृत्यू :- ६ मे १९२२

२६ जून हा दिवस महाराष्ट्रात '**सामाजिक न्याय्य दिवस**' म्हणून साजरा केला जातो.

महाराजांना '**राजर्षी**' ही पदवी त्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी त्यांच्या गुरुंनी दिली.

## आभाळ वाजलं...

आभाळ वाजलं धडामधूम ।
वारा सुटला सू सू सूम ।।
वीज चमकली चक चक चक ।
जिकडे तिकडे लख लख लख ।।
पाऊस आला धो धो धो ।
पाणी वाहिलं सो सो सो ।।
पाण्यात बोट सोडली सोडली ।
हातभर जाऊन बुडली बुडली ।।
बोटीवर बसला बेडूक बेडूक ।
तो ओरडला डरॉंव डूक, डरॉंव डूक ।।



## पर्यावरण

पर्यावरण म्हणजे आपल्या भोवती असलेला निसर्ग ! किंवा आपण असेही म्हणू शकतो की आपल्या भोवती असलेली हवा, पाणी, माती म्हणजेच पर्यावरण.

देवाने मानवाला इतर पशुंपेक्षा ताकद कमी दिली परंतु त्याने मानवाला बुद्धीचे वरदान दिले. ह्या बुद्धीच्या वरदानामुळे मानवाने आज त्याच्या आसपासच्या पर्यावरणावर मर्यादित प्रमाणात का होईना पण विजय मिळवू शकला आहे. ह्या पृथ्वीतलावर मानवाने त्याचे बदल घडवून आणले. पूर्वी ती शिकार करत असे तेव्हा त्याला जागोजागी भटकावे लागे. परंतु लवकरच त्याने अग्नीचा शोध लावला, चाकाचा शोध लावला आणि शेतीचाही शोध लावला. त्यामुळे एका ठिकाणी वस्ती करून राहणे त्याला शक्य झाले.

मानवजातीच्या सर्वांगीण विकासात पर्यावरणाचा महत्त्वाचा वाटा आहे. लोकांना पर्यावरणाचे महत्त्व समजावे आणि जनजागृती व्हावी यासाठी ५ जून रोजी 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा केला जातो. आधुनिकीकरणामुळे ग्लोबल वॉर्मिंग, वायू, जल प्रदूषण तसेच ओझोन थर कमी होणे अशा अनेक समस्या उद्भवल्या आहेत, यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.



पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आपण अधिका-धिक झाडे लावूया. पर्यावरणाची काळजी घेऊ या. म्हणजेच आजचा दिवस सत्कारणी लागेल आणि निसर्गाचे संरक्षण होण्यास आपला हातभार लागल्याचा आनंद होईल. चला तर मग

**झाडे लावू, झाडे जगवू**
**पर्यावरणाचे रक्षण करू !**

## योग दिवस २१ जूनच का ?

२१ जून हा दिवस जगभरातील अनेक देशांमध्ये सर्वांत मोठा दिवस असतो. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो. २१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायण सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. भारताचे तत्कालीन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्राच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्राच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला. यांवर विस्तृत चर्चा होऊन डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला. आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण शरीर तंदुरुस्त ठेऊ शकतो. २०२४ आंतरराष्ट्रीय योग दिवसासाठी 'स्वत:साठी व समाजासाठी योग' ही संकल्पना आहे.

## नियमित करावयाची आसने




## कलाकृती

(चला चिकटकाम करुया)





## फादर्स डे

फादर्स डे ही भारताची मूळ प्रथा नसून ती पाश्चात्य जगाच्या प्रभावाने पाळली जाते. जूनच्या तिसऱ्या रविवारी हा दिवस साजरा केला जातो. हा कार्यक्रम सार्वजनिक सुट्टीचा नाही. हा दिवस सहसा मुंबई, नवी दिल्ली, चेन्नई, बेंगळुरु, पुणे, कोलकाता आणि इतर मोठ्या शहरांमध्ये साजरा केला जातो. ईशान्येकडील नागालँड आणि केरळमध्ये ही मोठी सुट्टी आहे जिथे चर्चमध्ये रविवार सेवांवर प्रार्थना केली जाते. हा दिवस पहिल्यांदा युनायटेड स्टेटसमध्ये १९०८ मध्ये साजरा करण्यात आला आणि हळूहळू लोकप्रियता मिळवली, भारतीय महानगरांनी त्याचे अनुसरण केले. भारतात, हा दिवस सहसा मुले त्यांच्या वडिलांना भेटकार्ड आणि पुस्तके, यासारख्या भेटवस्तू देऊन साजरा करतात.




***मामाने मामीसाठी मऊ-मऊ मखमाऊ मोजे मावशीकडून मधाची मोरेगावहून मागवली.***

बरं का ! बालमित्रांनो, तुम्ही ही अशी गंमतीदार वाक्ये बनवून एकमेकांना सांगा.

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

२ | **जुलै २०२४** | **दैनंदिन उपक्रम -इ.३री** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ | ज्येष्ठ / आषाढ शके १९४६

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | **७** 'क' चौदाखडीमधील प्रत्येक अक्षराचे शब्द शोधून लिही. | **१४** पावसाची गाणी ऐक व नृत्य कर. | गुरुपौर्णिमा **२१** आजची पौर्णिमा 'गुरुपौर्णिमा' म्हणून का साजरी करतात. हे जाणून घे. | जागतिक निसर्ग संवर्धन दिन **२८** संवर्धन ह्या शब्दाचा अर्थ शोधून लिही. |
| सो सोमवार | महाराष्ट्र कृषी दिन<br>सनदी लेखापाल दिन<br>डॉक्टर्स डे **१** डॉक्टर आणि शेतकरी नसते तर ! काय झाले असते ? विचार कर आणि लिही. | **८** घरात अनावश्यक लाईट व इतर इलेक्ट्रीक उपकरणे चालू असतील तर बाबांच्या मदतीने बंद कर. | **१५** 'आ' अक्षराने सुरुवात होणारे शब्द शोधून लिही. | **२२** 'मामाचं पत्र हरवलं' हा खेळ वर्गात खेळ. | आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन **२९** व्याघ्रासन कसे करतात ते शिकून घे. |
| मं मंगळवार | **२** एखाद्याला मदत केल्यावर काय वाटते ? तुझ्या शब्दात लिही. | **९** सारख्या अक्षरांचा गट तयार करून लिही. | **१६** O X हा खेळ शिकून घे आणि खेळ. | लोकमान्य टिळक जयंती **२३** लोकमान्य टिळकांनी इंग्रजांना उद्देशून कोणते उद्गार काढले ? ते लिही. | **३०** मागील पानावरील चित्राचे निरीक्षण करुन त्यातील फरक ओळख. |
| बु बुधवार | **३** मी ..... जिल्ह्यात राहते/राहतो. माझ्या जिल्ह्यात ...... तालुके आहेत. त्यांची नावे पुढील प्रमाणे... | मातृ सुरक्षा दिन **१०** आईसाठी भेटकार्ड आणि बाबांच्या मदतीने आवडीचा पदार्थ बनव. | देवशयनी आषाढी एकादशी<br>मोहरम **१७** आजच्या सणांना सुट्टी का देतात ? हे शोधून काढ पाहू. | **२४** जुलै महिन्यात ५ वेळा येणारे वार कोणते ? ते लिही. | **३१** दोन गट करून आईकडील व वडीलांकडील नातेवाईकांची नावे लिही. |
| गु गुरुवार | **४** ठाणे जिल्हा महाराष्ट्राच्या नकाशात पाहून त्याच्या सभोवताली असणाऱ्या जिल्ह्यांची नावे क्रमाने लिही. | जागतिक लोकसंख्या दिन **११** तुला जे आवडेल ते कर. | **१८** आज दिवसभरात काय केलेस ते लिही. | **२५** कोणतेही एक चित्र घे आणि ५ ओळीचे चित्रवाचन कर. | |
| शु शुक्रवार | **५** आकाशाचे वेगवेगळे चित्र काढ आणि रंगव | **१२** सापशिडीचा खेळ खेळ. | **१९** प्रत्येक चौकोन तुला आवडेल त्या विविध रंगाने रंगव. | **२६** १ ते ५ पर्यंत अंक घेऊन जो अंक आहे, त्या अंकाएवढे, तितक्याच अंकांचे गट तयार कर. | |
| श शनिवार | **६** घोटीव कागदापासून नांगर होडी बनव. | **१३** पाणी उकळून व गाळून प्यावे अशी सुचना का सांगत असावे ? तुला काय वाटते ते लिही. | **२०** घोटीव कागदापासून आईस्क्रीम बनव. | **२७** ३ कागद घे त्यावर सरळ रेघा मार,कागदावर मारलेल्या सरळ रेषेवर आईसोबत असताना कात्रीने सरळ काप. | |

**अभिमान आमचा**



**यज्ञा जनार्दन भंडारी**

NMMS परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत ११ वी

इ.८ वी,

जि.प. शाळा मानिवली

# आनंद-तरंग

**आपण जे पेरतो ते उगवतं.**

## जुलै २०२४

ज्येष्ठ/आषाढ शके १९४६




पावसाळ्यात पावसासोबत काही वेळा गारा पडतात. गारा म्हणजे बर्फाचे लहान मोठे खडे होत. समुद्रातील पाण्याची सूर्याच्या उष्णतेमुळे वाफ होते. वाफ हलकी असल्यामुळे उंच आकाशात जाते. वाफ एकत्र होते व ढग तयार होतात. जसजसे उंच जावे तसतशी उष्णता कमी होत जाते. थंड हवेमुळे वाफेचे रुपांतर पाण्यात होते. हे पाणी थेंबांच्या रुपांनी खाली पडत राहते. यालाच आपण पाऊस असे म्हणतो. काही वेळा ढग खूपच थंड होतात. अशा वेळी ढगातील वाफेचे पाणी न बनता बर्फच तयार होतो. हे तयार झालेले बर्फाचे लहान मोठे खडे वेगाने जमिनीकडे येऊ लागतात. कारण बर्फाचे खडे जड असतात. यालाच आपण गारांचा पाऊस असे म्हणतो. गारांचा पाऊस पिकांचे नुकसान करतो.

## गुरुपौर्णिमा



आषाढ शुक्ल पौर्णिमेला गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. या पौर्णिमेला व्यासपौर्णिमा असे सुद्धा म्हणतात. भारतीय संस्कृतीत गुरुला ईश्वराचे स्थान आहे. आदी गुरु महर्षी व्यास ह्यांचा जन्म या दिवशी झाला. आई-वडील हे पहिले गुरु असतात. त्यानंतर शिक्षक हे आपले गुरु असतात. गुरु आपल्याला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जातात.

भारताला गुरुशिष्य यांची परंपरा लाभलेली आहे. शुक्राचार्य-जनक, सांदिपणी-श्रीकृष्ण, चाणक्य - चंद्रगुप्त, द्रोणाचार्य-अर्जुन इत्यादी गुरु-शिष्यांचा इतिहास पाहिल्यास प्रेम-निष्ठा यांची ओळख होते.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी अनेक जण आपल्या गुरुंची पुजा करतात, त्यांचे आशीर्वाद घेतात. या दिवशी गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळते.

## साहसी मच्छिमार

मच्छिमार म्हणजे मासे पकडणारे लोक. समुद्राकाठी राहणारे बहुतेक लोक मच्छिमार असतात. समुद्र हा प्रचंड मोठा पाण्याचा साठा आहे. समुद्राचे पाणी खारट असते. समुद्र खूप खोल असतो. समुद्रात सतत भरती व ओहोटी या क्रिया सुरु असतात. समुद्रात सतत लाटा उसळत असतात. क्वचित प्रसंगी वादळही होते. समुद्र खवळतो. अशा समुद्रात जाऊन मासे पकडणे हे सर्वसामान्य माणसाचे काम नसते. आपला दिवसातील बराच काळ अशा समुद्रात घालवणारे, सतत पाण्यात काम करणारे, होडी उलटल्यास न डगमगणारे, समुद्रातील अनेक जीवघेण्या अडचणींना तोंड देत आपले काम करणारे हे मच्छिमार आपल्यापेक्षा नक्कीच वेगळे असतात. ही कामे करणारा माणूस साहसीच असतो.







आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षात येणाऱ्या एकादशीला **आषाढी एकादशी** असे म्हणतात. याच एकादशीला **देवशयनी एकादशी** किंवा **महाएकादशी** असे म्हटले जाते. या दिवशी ज्ञानेश्वर, तुकाराम, सोपानदेव, निवृत्तीनाथ, एकनाथ यांच्या पालख्या चंद्रभागेच्या काठी येतात. या दिवशी लाखो भाविक पंढरपुरात विठ्ठल नामाचा गजर करतात.





## चला करूया कोलाज काम...





कलाकृती





**Spot the Difference**

## जागतिक व्याघ्र दिन



जागतिक व्याघ्र दिन दरवर्षी २९ जुलै रोजी जगभर साजरा केला जातो. २९ जुलै २०१० रोजी रशिया मधील सेंट पीटर्सबर्ग येथे भरलेल्या व्याघ्र परिषदेत हा दिवस 'जागतिक व्याघ्र दिन' म्हणून घोषित करण्यात आला. या दिवसाचा उद्देश वाघांच्या नैसर्गिक अधिवासांच्या संवर्धनासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करणे, तसेच त्याबद्दल जनजागृती करणे आणि वाघांच्या संवर्धनासाठी येणाऱ्या समस्यांवर विचार करणे असा आहे.

### मी कोण ?

मी तुम्हांला सावली देतो.
फळे देतो.
फुले देतो.
औषधही देतो.
दिवसभर भरपूर ऑक्सिजन मिळवून देतो.

### तुम्ही माझी काळजी कशी घ्याल ?


मला तोडू नका. मला पाणी घाला.
खूप झाडे लावा.
फक्त वाळलेल्या फांद्याच इंधनासाठी वापरा.
वादळामुळे मी मोडून पडलो,
तर दुसरे झाड लगेच लावा.




## मोहरम



इस्लामिक कॅलेंडरच्या पहिल्या महिन्याचे नाव मोहरम आहे. इस्लामिक कॅलेंडरमध्ये हा दिवस खूप महत्वाचा मानला जातो. कारण या दिवशी इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहम्मद यांचे धाकटे नातू हजरत इमाम हुसेन हे करबाल मध्ये आपल्या ७२ साक्षीदारांसह शहीद झाले होतो. हा महिना दु:खाचा महिना म्हणून साजरा केला जातो. इमाम हुसेन यांच्या हौतात्माच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.



चार ठिपक्यांच्या, चार ओळी रांगोळी...






*एक प्रवासी : तुमच्या गावात कोणी मोठा माणूस जन्मला आहे काय ?*

*मुलगा : नाही, आमच्या गावात सारी लहान मुलेच जन्मतात. मग ती मोठी होतात...*

## डोके चालवा...


१. प्रश्न असा आहे की, उत्तर काय आहे ?
२. अशी कोणती गोष्ट आहे जी पाणी प्याल्याने नष्ट होते ?
३. दोन अक्षरी नाव आहे, सर्दी नेहमी नाकावर, कागदावर मी ओकत असतो, मी कोण ते सांग.
४. अशी कोणती गोष्ट आहे जी आपण कापतो, पिसतो आणि वाटतो, पण खात नाही.
५. एका महालात चाळीस चोर, तोंड आहे काळे तर शेपूट आहे पांढरे...

-------------------------


उत्तर : प्रश्न, तहान, पेन, पत्ते, आगपेटी

## सुत्रे व क्लृप्त्या


### त्रिकोण-चौरस मोजणे

१) 

चौरस संख्या = वर्ग संख्यांची बेरीज
= (१x१)+(२x२)+(३x३)
= १+४+९
= १४

२) 


त्रिकोण संख्या = ४+३+२+१
= १० त्रिकोण



वरील सुत्रानुसार तुझ्या मनाने चौरस, त्रिकोण वाढवून अचूक चौरस, त्रिकोण मोज.

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग



३

## ऑगस्ट २०२४

## दैनंदिन उपक्रम -इ.३री

शैक्षणिक वर्ष २०२४-२५

आषाढ / श्रावण शके १९४६

### अभिमान आमचा





**अनन्या राजेश भगत**

मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत
महाराष्ट्र राज्यात ९ वी
ठाणे -पालघर जिल्ह्यात ४ थी
इ. २री जि.प. शाळा घोटसई



**उन्नती दिपक भोईर**

मंथन प्रज्ञाशोध परीक्षा २०२४
राज्यात ७७ वी
इ.४ थी जि.प. शाळा मामणोली

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | फ्रेंडशिप डे **४** मित्र आणि मैत्री यामधील अंतर शिक्षकांकडून जाणून घे. | **११** ग्लास आणि वाटी यांचा मनोरा तयार कर. | **१८** रक्षाबंधन कोणत्या नात्याचा सण आहे ? तो का साजरा करतात ? | **२५** तुला जे आवडेल ते कर. |
| सो सोमवार | | **५** तुला जे आवडेल ते कर. | **१२** वेगवेगळ्या फळांच्या बियांच्या संग्रह कर | जागतिक छायाचित्रण दिन रक्षाबंधन नारळीपौर्णिमा **१९** नारळी पौर्णिमेचे महत्त्व काय आहे? | श्रीकृष्ण जन्माष्टमी **२६** आजी-आजोबांकडून (मोठ्यांकडून) श्रीकृष्णाच्या गोष्टी ऐक. |
| मं मंगळवार | | **६** भारतात श्रावणात मांसाहार का करत नाही जाणून घे. | अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी  **१३** तीन अंकी संख्येची बेरीज कर. | भारतीय अक्षय्य ऊर्जा दिन **२०** मागील महिन्यात वीजबील किती आले ते घरी विचार आणि सांग. | गोपाळकाला **२७** दहीहंडी / गोपाळकाला कसा साजरा करतात ते लिही. |
| बु बुधवार | |  **७** त्रिकोणात तुला आवडतील ते रंग भर. | **१४** विविध प्राण्यांच्या-पक्ष्यांच्या नकला कर. | **२१** उर्जेची बचत कशी करु शकतोस याचा विचार कर आणि लिही. | **२८** 1 to 20 पर्यंत अंकाचे स्पेलिंग पाठ करुन लिही. |
| गु गुरुवार | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती लोकमान्य टिळक पुण्यतिथी  **१** आजच्या दिवसाचे महत्त्व जाणून घे. | **८** जागतिक आदिवासी दिवस का साजरा करतात? ते शिक्षकांकडून समजून घे. | स्वातंत्र्यदिन **१५** तिरंग्याचे चित्र काढ आणि रंगव. | **२२** नारळाचे चित्र काढून त्याबद्दल ५ ओळी लिही. | राष्ट्रीय क्रीडा दिन **२९** तुझ्या आवडीचा मैदानी खेळ मित्रासोबत एक तास खेळ. |
| शु शुक्रवार | **२** प्रत्येक महिन्यात येणाऱ्या सणांची यादी तयार कर. | नागपंचमी, ऑगस्ट क्रांतिदिन जागतिक आदिवासी दिन **९** नागपंचमी हा सण साजरा करण्याचा हेतू जाणून घे. | **१६** तुला आवडणारी छानशी राखी तयार कर. | **२३** मराठीतील रंगांची इंग्रजी नावे जास्तीतजास्त शोधून लिही. | राष्ट्रीय लघुउद्योग दिन **३०** लघू उद्योग म्हणजे काय ? त्यांची उदाहरणे सांगा. |
| श शनिवार | **३** तुला काय वाटते, मित्र कोणाला म्हणायचे ? खरा मित्र ही गोष्ट ऐक. | **१०** गोल आकार कापून फुलाप्रमाणे चिकटव. | **१७** ५ देशभक्तीपर गीते लिहून वहीत संग्रह कर. | **२४** तुला जे आवडेल ते कर. | **३१** श्रावण महिन्यातील सणांची यादी तयार कर. |

# आनंद-तरंग

नवं काहीतरी शिकण्यासाठी मिळालेला वेळ म्हणजे सुट्टी.



## लोकमान्य टिळक



लोकमान्य टिळक यांचे संपूर्ण नांव बाळ गंगाधर टिळक असे होते. त्यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी, रत्नागिरी येथील चिखली या गावी झाला. टिळक हे एक भारतीय स्वातंत्र्यसेनानी, शिक्षक, संपादक आणि लेखक होते.

लो. टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अग्रगण्य नेते आणि प्रबळ पुरस्कर्ते होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले होते. त्यांना 'लोकमान्य' ही पदवी बहाल करण्यात आली होती. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' या त्यांच्या घोषणेसाठी ते ओळखले जातात.

राजकीय जनजागृतीसाठी इ.स. १८९३ साली टिळकांनी घरगुती गणेशोत्सव हा सार्वजनिकरित्या सुरु केले. तसेच महात्मा फुलेंनी सुरु केलेल्या शिवजयंतीचे व्यापक स्वरुपात साजरीकरण केले.

## जागतिक मैत्री दिन

(फ्रेंडशीप डे)



आपल्या देशात ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी मैत्री दिवस साजरा केला जातो. या दिवशी मित्र-मैत्रिणी परस्परांना मैत्री दिवसाच्या शुभेच्छा देतात. एकमेकांना रंगीत धागे बांधतात. फुले, पुष्पगुच्छ, भेटवस्तू देतात आणि आपली मैत्री चिरंतन राहो अशा सदिच्छा व्यक्त करतात.



1) Independence day is our national Festival.
2) It is celebrated on 15th August.
3) We got freedom on 15th August 1947.
4) All Indians celebrate this day with joy & enthusiasm.
5) The day is celebrated with Flag hoisting, parades, and other cultural activities.
6) The Prime Minister of India hoists the National Flag at Red Fort, Delhi.
7) It is a day of pride, integrity shows unity among Indians.

## अण्णा भाऊ साठे




अण्णा भाऊ साठे यांचे संपूर्ण नांव तुकाराम भाऊराव साठे असे होते. त्यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी, वाटेगांव, जिल्हा सांगली येथे झाला. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमाणसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी केले. अण्णा भाऊ साठे यांनी कादंबऱ्या, लघुकथा, नाटक व पोवाडे यांचे लेखन केले आहे.

## नागपंचमी



श्रावण महिन्यात येणारा पहिला सण म्हणजे नागपंचमी. या दिवशी नाग देवतेची पूजा केली जाते. ग्रामीण भागातील स्त्रिया पारंपरिक वेशभूषा करून वारुळाची पूजा करतात. या दिवशी स्त्रिया व मुली, झोका, झिम्मा व फुगडी खेळतात व नागपंचमीची गाणी म्हणतात.

## तीन ठिपक्यांची रांगोळी




## 'काना' शब्दाचा अर्थ बदलतो.

काही शब्दांतील अक्षरांना कोणतेच स्वरचिन्ह जोडलेले नसते. 'काना' हे एक स्वरचिन्ह आहे. 'जग'हा शब्द बघा. जग म्हणजे दुनिया, सृष्टी. यातील पहिल्या अक्षराला काना जोडल्यावर 'जाग' हा शब्द तयार होतो. याचा अर्थ झोपू नकोस असा होतो. याच शब्दातील उरलेल्या अक्षराला काना जोडल्यास 'जागा' हा शब्द तयार होतो. जागा म्हणजे ठिकाण किंवा न झोपलेला. 'जग' या शब्दातील अक्षरांना काना जोडल्यामुळे असे वेगवेगळ्या अर्थाचे शब्द तयार होतात. 'पत्र' या शब्दापासून काना जोडून पात्र व पत्रा असे वेगवेगळ्या अर्थाचे शब्द तयार होतात. अशाच पद्धतीने गजर, गाजर, गजरा हे वेगवेगळ्या अर्थाचे शब्द तयार होतात. मन, बस, पर, सडक, वचन, कसर या शब्दांतील अक्षरांना काना देऊन तयार होणाऱ्या शब्दांचे अर्थ शोधा.

## मराठी शब्दकोडे

| | | |
|---|---|---|
| अ | | म |
| | | |
| र | | ळ |




## ढग म्हणजे काय ?

सूर्याच्या उष्णतेमुळे समुद्र, नद्या, तळी, विहिरी यांतील पाण्याची वाफ होते. वाफ हलकी असल्यामुळे वर वर जाऊ लागते. हवेत नुसते वायूच नसतात. हवेत मातीचे, धुराचे, वनस्पतींचे अनेक लहान लहान कणही तरंगत असतात. असे सूक्ष्म कण आकाशात असंख्य प्रमाणात असतात. या कणांवर वाफेचे कण साठतात. अशा वाफेने समृद्ध असलेल्या असंख्य कणांचा मिळून ढग तयार होतो. हवेत धुळीचे असे कण नसल्यास ढग तयार होण्याची क्रिया होणार नाही. ढग म्हणजे पाण्याच्या अदृश्य थेंबांचा समूहच असतो. अतिशय उंचावर थंडी असते. ढग ठरावीक उंचीवर गेल्यावर त्यातील वाफेचे पाणी होते. हे पाणी थेंबांच्या स्वरुपात जमिनीवर पडते. यालाच आपण पाऊस म्हणतो. पावसाची शक्यता आपल्याला आकाशातील ढग पाहून कळते. काही वेळा अतिशय थंडीमुळे ढगातील वाफेचे हिम बनते. अशा वेळी गारांचा पाऊस पडतो.



## गोकुळाष्टमी



श्रीकृष्ण जन्माष्टमी या सणाला गोकुळाष्टमी असेही म्हणतात. हा सण दरवर्षी श्रावण महिन्यात कृष्ण पक्षातील अष्टमीला साजरा केला जातो. भगवान श्रीकृष्णाचा या दिवशी जन्म झाला होता. श्रीकृष्ण हे माता देवकी व पिता वासुदेव यांचे आठवे पुत्र होते. भगवान कृष्णाचे पालन-पोषण माता यशोदा व नंदबाबा यांनी केले. श्रीकृष्णांनी अत्याचारी कंसाचा वध केला. जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाला म्हणजेच दहिहंडी असते.




**गुरुजी :** *काय रे, वर्गात डुलक्या देतोस ?*
**पिंटू :** *नाही गुरुजी, गुरुत्वाकर्षणाने डोके खाली पडते.*

## रक्षाबंधन



हा सण दरवर्षी श्रावण पौर्णिमेला साजरा केला जातो. या सणाला राखीपौर्णिमा किंवा नारळी पौर्णिमा म्हणतात. रक्षाबंधन हा सण स्नेहाचे प्रतीक मानले जाते. बहिण-भावाच्या प्रेमळ नात्याचा हा सण आहे. श्रावण महिना हा सणांचा महिना म्हणून ओळखला जातो.

## पावसाचे ढग

आकाशात बहुतेक वेळा आपल्याला ढग दिसतातच. कधी कधी आकाश निरभ्र म्हणजे ढग विरहित दिसते. पावसाळा सोडून इतर वेळी दिसणारे ढग हे पांढरे दिसतात. हे पांढरे ढग आकाशात खूप उंचीवर दिसतात. पावसाळ्यात आढळणारे ढग हे काळ्या रंगाचे असतात. हे काळे ढग जमिनीपासून त्यामानाने जवळ दिसतात. पावसाळ्यात डोंगराजवळ असणारे ढग पाहिल्यास हे चटकन लक्षात येते. पावसाळ्यातील ढग हे पाण्याने तयार झालेले असतात. जमिनीवर समुद्राच्या पाण्यापासून तयार झालेली वाफ हलकी असल्यामुळे आकाशात खूप उंचीवर जाते. आकाशात असंख्य धूलिकणही तरंगत असतात. खूप उंचीवर तापमान कमी असते. त्यामुळे वाफेच्या कणांचे सूक्ष्म पाण्याच्या थेंबांत रुपांतर होते. हे कण धूलिकणांवर स्थिर होतात. असे असंख्य कण एकत्र येऊन ढग तयार होतात.

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

| ४ | सप्टेंबर २०२४ | दैनंदिन उपक्रम - इ.३री<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ | श्रावण / भाद्रपद शके १९४६ |
|---|---|---|---|

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र<br>रविवार | **१**<br>तुला जे आवडेल ते कर. | **८**<br>Cat ची सर्व Rhyming words लिही.<br>Cat शब्दसाखळी तयार करून लिही. (२० शब्द) | **१५**<br>तुला आवडेल ते चित्र किंवा ५ ओळी दुसऱ्या हाताने काढ. | **२२**<br>तुझ्याशी नदी बोलू लागली तर... मित्राला सांग. | **२९**<br>दोन्ही हातात दोन चेंडू घेऊन तो झेलण्याचा प्रयत्न कर. |
| सो<br>सोमवार | मातृदिन, पोळा<br>पिठोरी आमावस्या<br><br>**२**<br>आपण पोळा सण का साजरा करतो त्याची माहिती लिही. | ग स म णे<br>अ जा री ण<br>गौ श ती न<br>प न र य<br>**९**<br>जास्तीत जास्त शब्द तयार कर. | मोहमद पैगंबर जयंती<br>ईद-ए-मिलाद<br><br>**१६**<br>'अहमदनगर' शब्दापासून अनेक लहान शब्द तयार करून लिही. | **२३**<br>शाळेत येताना तुला वाटेत काय-काय दिसले ते लिही. | **30**<br>१ ते ५० अंकांची बेरीज किती येते ? ते सांग. |
| मं<br>मंगळवार | **३**<br>तुझा वाढदिवस घरी कसा साजरा करतात ? ते सांग. | ज्येष्ठा गौरी आवाहन<br>**१०**<br>तुला जे आवडेल ते कर. | अनंत चतुर्दशी<br>**१७**<br>स्वत:च्या मनाने आडवे, उभे शब्द तयार कर. | **२४**<br>नळ चालू दिसल्यास तो बंद का करावा ? | |
| बु<br>बुधवार | **४**<br>एका वाक्यावरून अनेक प्रश्न तयार करून लिहा. राहूल आईबरोबर बाजारात रिक्षाने गेला. | ज्येष्ठा गौरी पूजन<br>**११**<br>३ ते ११ पर्यंत अंक वापरून सरळ व आडवी बेरीज २१ येईल अशी चौकट पूर्ण करा. | **१८**<br>तुझ्या वर्गातील सर्व मुला-मुलींची नावे लिही. | **२५**<br>तुला जे आवडेल ते कर. | |
| गु<br>गुरुवार | शिक्षक दिन<br><br>**५**<br>तुझ्या शाळेत शिक्षक दिन कसा साजरा झाला ? आईला सांग. | ज्येष्ठा गौरी विसर्जन<br>गौरी विसर्जन<br>**१२**<br>१०० ते १ उलट क्रमाने अंक अक्षरात लिही. | **१९**<br>असे शब्द शोध की उलट-सुलट वाचल्यावर तोच शब्द तयार होतो. उदा. - डालडा | **२६**<br>दोन मिनिटात जास्तीत-जास्त इंग्रजी शब्द लिही. | |
| शु<br>शुक्रवार | हरितालिका<br>**६**<br>उलट्या दोरीउड्या मारण्याची कृती कर | **१३**<br>मो -<br>ग -<br>रा -<br>शब्दातील अक्षरामागील लपलेले वाक्य तयार करुन लिही. मोगरा.. | **२०**<br>शाळेत कचरापेटी नसेल तर..! ५ ओळी माहिती लिही. | जागतिक पर्यटन दिन<br><br>**२७**<br>सप्टेंबर महिन्याची दिनदर्शिका पाहून त्यावर आधारित शिक्षकांच्या मदतीने जास्तीत जास्त प्रश्न तयार कर. | |
| श<br>शनिवार | गणेश जयंती<br><br>**७**<br>मातीपासून गणपती तयार कर किंवा गणपतीचे चित्र काढून रंगव. | हिंदी दिवस<br>**१४**<br>आज वर्गात हिंदी भाषेत बोलू या. | **२१**<br>वज्रासन व पद्मासनात डोळे बंद करून ३ मिनीटं शांत बसूया. | **२८**<br>शेवटी Y अक्षर येणारे शब्द जास्तीत जास्त लिही. | |

## अभिमान आमचा



सेजल सुभाष कराळे
NMMS परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत ४५ वी
इ.आठवी जि.प. शाळा मानिवली




प्रचिती रवींद्र भोईर
ठाणे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ३री
इ.६वी जि.प.शाळा घोटसई

# आनंद-तरंग

सुंदर विचार सोबतीला असतील तर माणूस एकटा राहत नाही.



## कोडी सोडवा




## बैलपोळा



बैलपोळा हा श्रावण अमावस्या किंवा भाद्रपद अमावस्या या तिथीला साजरा करण्यात येणारा बैलांचा सण आहे. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा विशेषत: विदर्भात भव्य पातळीवर साजरा केला जातो.

हा दिवस बैलांच्या विश्रांतीचा दिवस असतो. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना आमंत्रण देण्यात येते. पोळ्याला त्यांना नदीवर / ओढ्यात नेऊन अंघोळ घालतात. नंतर चारा देऊन घरी आणतात. या दिवशी बैलाच्या खांद्याला हळद व तुपाने शेकतात. याला 'खांदे शेकणे' म्हणतात. त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेली झूल पांघरतात. सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा, पायात चांदीचे अथवा करदोड्याचे तोडे घालतात. त्याला खायला गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात.

## 'शिक्षक दिन'

५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन असतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे एक महान शिक्षक व भारताचे दुसरे राष्ट्रपती होते. त्यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ मध्ये तामिळनाडू राज्यातील तिरुत्तनी येथे झाला. इ.स.१९५४ साली भारत सरकारने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना देशाचा सर्वोच्च मानाचा 'भारत रत्न' पुरस्कार देऊन गौरविले.

## आवश्यक आणि अनावश्यक

आवश्यक म्हणजे गरज असलेले आणि अनावश्यक म्हणजे गरज नसलेले. दररोज प्रत्येकाला अन्न खाणे आवश्यक असते. सकाळी उठल्यानंतर दात घासणेही आवश्यकच असते. याचप्रमाणे, शाळेत शिस्त पाळणे, दररोज स्वच्छ अंघोळ करणे, स्वच्छ कपडे घालणे, व्यायाम करणे या व अशा आणखी काही गोष्टी आवश्यक म्हणून सांगता येतील. जेवताना दररोज पक्वान्ने हवी असणे, नवे किंवा इस्त्री केलेलेच कपडे हवे असणे, नको असताना भरमसाठ दिवे लावणे, दिसेल त्या वस्तू घेणे, पाण्याचा गैरवापर करणे, कोरे कागद असलेल्या वह्या रद्दीत घालणे या अनावश्यक गोष्टी आहेत. अनावश्यक गोष्टी करण्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचे आपण नुकसानच करत असतो.

## अनेक बियांची फळे



प्रत्येक फळ त्याच्या वेगळ्या गुणधर्मामुळे चटकन ओळखता येते. काही फळे आकाराने लहान असली तरी त्या फळांत अनेक लहान लहान बिया आढळतात. काही फळांत एकच बी आढळते. करवंद ही लहान फळे आहेत. या फळांत छोट्या बिया असतात. पेरू हे थोडे मोठे फळ आहे. या फळात असंख्य लहान बिया असतात. लिंबू, संत्री, मोसंबी या फळांत बिया लहानच असतात. या फळात अनेक बिया असतात; पण त्या अधिक प्रमाणात नसतात. सीताफळ, रामफळ या फळांत अधिक प्रमाणात अनेक बिया असतात. कलिंगडातही काळ्या रंगाच्या छोट्या बिया असतात. काकडीतही अनेक चपट्या बिया असतात. सफरचंदात काही छोट्या बिया आढळतात.

## ओळखा पाहू ?

१) एवढसं कारटं घर कसं राखतं ?
२) इथेच आहे पण दिसत नाही.
३) सुपभर लाह्या त्यात एक रुपया.
४) हात आहेत पण हालत / हालवत नाही.
५) दोन भाऊ शेजारी, भेट नाही जन्मांतरी !
६) माझ्याकडे पंख नाही पण मी उडते.
७) आगीमध्ये जळत नाही, पाण्यामध्ये भिजत नाही.
८) कोकणातून आला भट, त्याला धर की आपट
९) रंग नाही, वास नाही, आकार नाही मी असे कोणते फूल

उत्तर : एप्रिल फूल, नारळ, सावली, पतंग, डोळे, खुर्ची, चंद्र-चांदण्या, वारा, कुलूप

## बिया नसलेली फळे



फळांचे आकार वेगवेगळे असतात. फळांचे रंग वेगवेगळे असतात. फळांच्या चवीही वेगवेगळ्या असतात. फळात बिया असतातच असेही नाही. फळाच्या आकारावरही बीचे आकारमान अवलंबून नसते. बहुतेक फळांत बिया असतातच. काही फळांत मात्र बिया दिसत नाहीत. केळ हे आपल्या सर्वांच्या परिचयाचे फळ आहे. केळात बिया दिसत नाहीत; पण केळात अगदी लहान अविकसित बिया असतात. पूर्वी द्राक्षात लहान लहान बिया आढळत असत. आता संशोधन करून द्राक्षांच्या नव्या जाती विकसित केलेल्या आहेत. या प्रकारच्या द्राक्षात बिया आढळत नाहीत. जुन्या वाणाच्या पपईत भरपूर काळ्या बिया आढळायच्या. आता संशोधन करून विकसित केलेल्या पपयांच्या जाती बिनबियांच्या आहेत. बिया नसलेली फळे सहजपणे खाता येतात. पण अशा प्रकारची फळे कमीच आहेत.





कावळा - कावळे

वाघ - वाघ




## मराठी शब्दकोडे







गुरुजी : चिंटू आसाममध्ये काय पिकते सांग?
चिंटू : माहित नाही सर.
गुरुजी : अरे, तू चहा पितोस ना! तो कुठून येतो?
चिंटू : किचनमधून...

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

५

## ऑक्टोबर २०२४

**दैनंदिन उपक्रम -इ.३री**
शैक्षणिक वर्ष २०२४-२५

भाद्रपद / आश्विन शके १९४६

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | **अभिमान आमचा**  स्वयम रविंद्र खरखर<br>भारत टॅलेंट सर्च परीक्षा राज्यात ९वा<br>इ.: २ री जि. प. शाळा कांबा | **६**<br>A पासून Z पर्यंत आवाज लिही व पाठ कर.<br>उदा. :- A चा आवाज अ, ॲ, आ | **१३**<br>आईच्या कामाचे निरीक्षण कर. | **२०**<br>तुला जे आवडेल ते कर. | **२७**<br>आईला घरकामात मदत कर. |
| सो सोमवार | | **७**<br>रंगीत कार्डशीट /घोटीव कागदापासून फोटो फ्रेम बनव. | **१४**<br>आई बद्दल पाच वाक्य लिही. | **२१**<br>'म' अक्षराचे शब्द जास्तीत जास्त लिही. | वसुबारस<br>**२८**<br>गाईबद्दल ५ वाक्ये लिही. |
| मं मंगळवार | **१**<br>मागील पानावरील महात्मा गांधीजी यांच्याबद्दल माहिती वाच व ५ प्रश्न तयार कर. | भारतीय वायुसेना दिन<br> <br>**८**<br>आजचा दिवस साजरा करण्याचा हेतू शिक्षकांकडून समजून घे. | राष्ट्रीय विद्यार्थी दिन<br>अंध सहाय्यता दिन<br>भारतीय विक्रेता दिन<br>**१५**<br>अवयव दान याबद्दल शिक्षकांकडून माहिती जाणून घे. | **२२**<br>आई दिवाळीची तयारी कशी करत आहे याचे निरीक्षण कर. | धनत्रयोदशी<br>धन्वंतरी जयंती<br><br>**२९**<br>दिवाळीच्या फराळाची यादी बनव. |
| बु बुधवार | स्वच्छता दिन<br>महात्मा गांधी जयंती<br>लाल बहादूर शास्त्री जयंती<br><br>**२**<br>मागील पानावरील लाल बहादूर शास्त्री यांच्याबद्दल माहिती वाच व ५ प्रश्न तयार कर. | जागतिक टपाल दिन<br><br>**९**<br>टपाल म्हणजे काय ? शिक्षकांकडून माहिती जाणून घे. | कोजागिरी पौर्णिमा<br>शरद पौर्णिमा<br><br>**१६**<br>कोजागिरी पौर्णिमा कशी साजरी करतात ? शिक्षकांकडून जाणून घे. | **२३**<br>१ ते २० अंक इंग्रजीमध्ये उलट क्रमाने तोंडी म्हण. | **३०**<br>५० रुपयांचे सुट्टे किती प्रकारे करशील ? करून दाखव. |
| गु गुरुवार | घटस्थापना<br>शारदीय नवरात्रारंभ<br><br>**३**<br>`A' for Apple याप्रमाणे Z पर्यंत लिही. | महालक्ष्मी पूजन<br>सरस्वती पूजन<br>**१०**<br>सूर्याचे चित्र काढ व रंगव. | **१७**<br>पहिले अक्षर a, i, o, u English मधील दोन अक्षरी शब्द शोधून लिही व वाच. | **२४**<br>बाबांसोबत किराणा दुकानात जा आणि दुकानदार कोणकोणते वजने वापरतो याचे निरीक्षण कर. | नरक चतुर्दशी<br>राष्ट्रीय एकता दिन<br><br>**३१**<br>आईने केलेले लाडू मोज. |
| शु शुक्रवार | **४**<br>तुला आवडेल ते चित्र काढ व रंगव. | दुर्गाष्टमी<br>**११**<br>तुला जे आवडेल ते कर. | **१८**<br>जास्तीत जास्त शब्दांची ३० मिनिटात वाक्ये बनव. | **२५**<br>फटाक्यांमुळे वृद्ध माणसांना काय त्रास होतो याचे निरीक्षण कर. | **अभिमान आमचा**  वीर संतोष शेलार<br>हार्मोनियम, तबला, गायन वादन<br>इ.: ७ वी जि. प. शाळा नांदप |
| श शनिवार | **५**<br>पुस्तकातले चित्र बघ, निरीक्षण कर आणि ५ वाक्ये लिही. | विजया दशमी<br>दसरा<br><br>**१२**<br>मोबाईलमध्ये जंगलाचे चित्र बघ व त्याचे निरीक्षण करून १० वाक्ये लिही. | **१९**<br>फुलझाडे / फळझाडांच्या नावांची यादी तयार कर | **२६**<br>रंगीत कार्डशीट / घोटीव कागदापासून आकाश कंदील बनव. | |

## महात्मा गांधी जयंती



२ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर या ठिकाणी राष्ट्रपिता महात्मा गांधींचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी होते. महात्मा गांधींच्या विचाराने देशाला स्वातंत्र्य मिळाले यामुळे लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल प्रचंड आदर आहे. भारतात त्यांनी सत्याग्रह आणि अहिंसेच्या मार्गाने ब्रिटिशांच्या विरोधात लढा सुरु केला. १९१९ सालचे असहकार आंदोलन, १९३० सालचं सविनय कायदेभंग आणि १९४२ सालचे "चले जाव आंदोलन" हे त्यांनी उभारलेल्या आंदोलनातील सर्वात मोठे आंदोलन होते. त्यांच्या आंदोलनाला यश मिळालं आणि भारताला सविनय मार्गाने स्वातंत्र्य मिळालं. गांधीजींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार केला आणि स्वत:देखील याच तत्त्वांनुसार आयुष्यभर जगले.

## आवळ्याचे उपयोग




आवळ्याच्या दोन जाती आहेत. एक असतो साधा आवळा आणि दुसरा असतो राय आवळा. झाडावर आवळे घोसाने लागतात. आवळ्यांचे आकारही लहानमोठे असतात. तयार आवळे आंबट, तुरट लागतात. आवळे साखरेच्या पाकात टाकून मुरवतात. याला 'मुरावळा' असे म्हणतात. आवळ्याचे लोणचे करतात. आवळ्याची सुपारी अगर वड्या तयार करतात. आवळ्यात 'सी' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. असा हा आवळा आपल्या देशात सर्वत्र मिळतो. साधारणपणे दिवाळीच्या सणापासून बाजारात आवळे मिळायला सुरुवात होते.

## डोके चालवा

### दोन अक्षरी अवयवांची नावे ओळख.

१. चावणारे : ☐ ☐
२. चालणारे : ☐ ☐
३. बोलणारे : ☐ ☐
४. बघणारे : ☐ ☐
५. ऐकणारे : ☐ ☐
६. चव घेणारी : ☐ ☐
७. वळणारी : ☐ ☐
८. डोक्यावरचे : ☐ ☐
९. विचार करणारा : ☐ ☐
१०. वास घेणारे : ☐ ☐
११. अंगावरची कात : ☐ ☐
१२. झोपण्यासाठी टेकलेली : ☐ ☐
१३. गोबरे-गोबरे : ☐ ☐
१४. जेवण झाल्यावर भरणारे : ☐ ☐
१५. शरीराच्या मध्यभागाची खूण : ☐ ☐
१६. दुसऱ्यांकडे दाखवतात : ☐ ☐
१७. कपाळ : ☐ ☐
१८. आवाज फुटणारा : ☐ ☐
१९. काम करणारे : ☐ ☐
२०. आधार देणारा : ☐ ☐

## लाल बहादुर शास्त्री




लाल बहादुर शास्त्री यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशमधील मुघलसराई या लहान गावात झाला. त्यांचे पूर्ण नाव लालबहादुर शारदाप्रसाद श्रीवास्तव. १९३० मध्ये, म. गांधींनी दांडी यात्रा केली आणि मिठाचा कायदा मोडला. या गोष्टींनी प्रभावीत होऊन लाल बहादुर शास्त्री यांनी स्वातंत्र्य लढ्यात स्वत:ला झोकून दिले. त्यांनी अनेक विद्रोही मोहिमांचे नेतृत्व केले आणि एकूण सात वर्षे ब्रिटीश तुरुंगवासात घालवली.

देश स्वतंत्र झाल्यानंतर १९५१ मध्ये त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात रेल्वेमंत्री, वाहतूक आणि दळणवळण मंत्री, वाणिज्य आणि उद्योग मंत्री, गृहमंत्री आणि पंडित नेहरुंच्या आजारपणात बिनखात्याचे मंत्री म्हणून काम पाहिले. १९६४ साली पंडित नेहरुंच्या मृत्यूनंतर ते भारताचे पंतप्रधान झाले. लाल बहादुर शास्त्री हे त्यांच्या साध्या राहणीमानासाठी प्रसिद्ध होते. १९६५ च्या युद्धात त्यांनी 'जय जवान, जय किसान' चा नारा दिला होता.

## वीज बचत करणारे एलइडी दिवे



मोबाईल फोनमध्ये उजेड पडतो. हल्ली छोट्या छोट्या दिव्यांच्या छोट्या, मोठ्या विजेऱ्याही बाजारात मिळतात. या उपकरणांत छोटे-छोटे दिवे बसवलेले आढळतात. असे छोटे दिवे एकत्र बसवलेले मोठे दिवेही मिळतात. या दिव्यांना एलइडी दिवे असे म्हणतात. या दिव्यांना पूर्वीच्या तारांच्या दिव्यांपेक्षा किंवा सीएफएफ दिव्यांपेक्षाही अतिशय कमी वीज लागते. त्या तुलनेत प्रकाशही भरपूर मिळतो. इतर दिव्यांच्या तुलनेत हे दिवे टिकतातही खूप काळ. या दिव्यांत उष्णताही निर्माण होत नाही. या दिव्यांचा पांढराशुभ्र प्रकाशही चांगला वाटतो. इंग्रजीत या दिव्यांसाठी White LED असा शब्द वापरतात.



## नावे शोधा

| | | | |
|---|---|---|---|
| | र | | र |
| | रा | | ई |
| | र्षा | | णी |
| | धू | | ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | ण | | त |
| | च्च | | ता |
| | द्र | | त |
| | दा | | व |

| | | | |
|---|---|---|---|
| | द्या | | ती |

## ओळखा पाहू

१) तू माझा भाऊ आहेस पण मी तुझा भाऊ नाही.
२) तीन जण जेवायला बारा जण वाढायला.
३) कान असून बहिरे.
४) पाय असून चालता येत नाही.
५) थंड असता काळा, गरम असता लाल, फेकला तर सफेद
६) पांढरे पातेले त्यात पिवळा भात
७) तिखट मीठ मसाला, चार शिंगे कशाला ?

उत्तर : लवंग, अंडे, टेबल, कप, घड्याळ, कोळसा, बहीण


## भाज्या आवडीने खा



भाज्या म्हणजे वनस्पतींची पाने, खोडे व फळे. आपण काही वनस्पतींची पाने खातो. मेथी, चाकवत, पालक या पालेभाज्या आहेत. काही वनस्पतींची फळे आपण भाजी करण्यासाठी वापरतो. कारली, दोडके, भेंड्या या फळभाज्या आहेत. बहुतेक पालेभाज्या किंवा फळभाज्या हिरव्या रंगाच्या असतात. त्या तंतुमय पदार्थांनी भरलेल्या असतात. भाज्यांत वेगवेगळ्या प्रकारची जीवनसत्त्वे व क्षार असतात. जीवनसत्त्वे व क्षार आपल्या शरीराच्या वाढीसाठी, रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी उपयोगी असतात. भाज्यांमधील तंतुमय पदार्थ म्हणजे चोथा आपल्या पचनक्रियेला मदत करतो. या सर्व फायद्यांसाठी आपण दररोज वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या खायला हव्यात.

## मराठी शब्दकोडे

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| का | | ळा |







बाबा : काय रे तुझ्या वर्गात सर्व विद्यार्थी पास झाले का ?
चिंटू : हो. आम्ही सगळे पास झालो. फक्त आमच्या मॅडम नापास झाल्या.
बाबा : आंऽऽ मॅडम कशा नापास होतील ?
चिंटू : कारण, अजून त्या आधीच्याच वर्गाला शिकवतात.

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

६

## नोव्हेंबर २०२४

**दैनंदिन उपक्रम -इ.३री**
शैक्षणिक वर्ष २०२४-२५

आश्विन / कार्तिक शके १९४६

### अभिमान आमचा



**मनस्वी योगेश पाटील**
पूर्व उच्च प्राथमिक
शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण
इ.५वी
जि.प. शाळा हेदुटणे



**रिया शरद पावशे**
मंथन प्रज्ञाशोध परीक्षा
केंद्रस्तरावर २रा क्रमांक
भारत टॅलेंट सर्च परीक्षेत
राज्यात ७वा क्रमांक
इ.२री जि.प. शाळा कांबा

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | यमद्वितीया भाऊबीज **३** चकली, करंजी, लाडू, शंकरपाळे यांची चित्रे काढून रंगव. | **१०** तुला आवडणाऱ्या लहान मुलांच्या गोष्टी ऐक. | **१७** स्वत:चा पत्ता, मोबाईल क्रमांकासहीत लिही व पाठ कर. | **२४** पेन्सिलचा उपयोग किंवा माहिती ५ ते ७ वाक्यात लिही. |
| सो सोमवार | | **४** तुला जे आवडेल ते कर. | शिक्षण दिन **११** बडबडगीते, बालगीते ऐक व म्हण. | **१८** स्वत:विषयी पाच वाक्यात माहिती लिही. | **२५** तु वाचलेल्या २ पुस्तकांची नावे लिही. |
| मं मंगळवार | | मराठी रंगभूमी दिन **५** तू शाळेत कोणत्या वस्तू घेऊन जातो त्याची यादी तयार कर. | **१२** घोटीव कागदापासून दोन वस्तू तयार कर. | इंदिरा गांधी जयंती  **१९** आवडती कविता/गाणे साभिनय सादर कर. | संविधान दिवस **२६** संविधान दिनाची मागील पानावरील माहिती वाचून जास्तीत जास्त प्रश्न तयार कर. |
| बु बुधवार | | **६** तुला जे आवडेल ते कर. | तुलसी विवाहारंभ **१३** एकत्र येऊन चिवडा पार्टी करा. | **२०** पाच शब्दांची साखळी तयार कर. | **२७** खोडरबर आणि गिरमिट नसते तर ! ५ वाक्यात लिही. |
| गु गुरुवार | | शिशू संरक्षण दिन **७** Wonderful या शब्दाचे छोटे छोटे शब्द तयार कर. | पंडित जवाहरलाल नेहरु जयंती बालदिन **१४** छानशी रांगोळी काढ व रांगोळीत रंग भर. | **२१** औषधी वनस्पतींची नावे शोधून लिही. | महात्मा फुले पुण्यदिन **२८** तुला आवडणाऱ्या मैदानी खेळांची माहिती शोधून लिही. |
| शु शुक्रवार | दीपावली लक्ष्मी कुबेर पूजन दर्श अमावस्या **१** दिवाळीच्या सुट्टीसाठी गावी आलेल्या तुझ्या मित्रांसोबत मनसोक्त खेळ. | **८** 1 to 100 पर्यंतचे अंक दोन वेळा इंग्रजी अक्षरात लिही. | गुरुनानक जयंती त्रिपुरारी पौर्णिमा **१५** दिवाळी सण तुला का आवडतो? ते लिही. | **२२** तुला जे आवडेल ते कर. | **२९** तुला जे आवडेल ते कर. |
| श शनिवार | दीपावली पाडवा बलिप्रतिपदा **२** आज मित्रांसोबत किल्ला बनव. | **९** फटाक्यांच्या प्रकाराची यादी कर. | **१६** तू कोणकोणते वैयक्तिक खेळ खेळतो ते सांग | **२३** शाळेत दिसणाऱ्या वस्तूंची नावे विचारून लिही व उपयोग सांग. | **३०** शब्दांमध्ये 'ट' अक्षर येणारे शब्द जास्तीत जास्त शोधून लिही. |

# आनंद-तरंग

आयुष्यात भावनेपेक्षा कर्तव्य मोठे असते.

## नोव्हेंबर २०२४


अश्विन / कार्तिक शके १९४६


## दीपावली




दिवाळी किंवा दीपावली हा प्रकाशाचा सण आहे. ''अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे'' प्रतीक म्हणून या सणाला ओळखतात. हिंदू चांद्रमास आश्विन आणि कार्तिक या महिन्यांत म्हणजे सप्टेंबर आणि नोव्हेंबरच्या मध्यात दिवाळी साजरी केली जाते. हा उत्सव साधारणपणे पाच ते सहा दिवस चालतो. या उत्सवादरम्यान लोक त्यांची घरे, मंदिरे आणि कार्यस्थळे दिवे, मेणबत्या आणि कंदीलांनी प्रकाशित करतात. हिंदू उत्सवाच्या प्रत्येक दिवशी पहाटे अभ्यंगस्नान करतात. फटाके आणि रांगोळीच्या सजावटीसाठी देखील दिवाळी ओळखली जाते. मेजवानी आणि मिठाई हा या सणाचा मुख्य भाग आहे. केवळ कुटुंबांसाठीच नव्हे तर समुदाय आणि विशेषत: शहरी भागातील लोकांसाठी दिवाळी म्हणजे वार्षिक एकत्र येण्याचा कालावधी असतो.

## रांगोळीत रंग भरा







## इंदिरा गांधी जयंती



इंदिरा गांधी या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होत्या. त्यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी अलाहाबाद (प्रयाग राज) येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नांव पं. जवाहरलाल नेहरु व आईचे नांव कमला नेहरु असे होते. लहानपणा पासून 'नेतृत्व' हा महत्त्वाचा गुण त्यांच्या अंगी होता. इंदिरा गांधी यांनी आपल्या पंतप्रधान पदाच्या काळात आर्थिक, सामाजिक व वैज्ञानिक क्षेत्रात खूप प्रगती केली. इंदिरा गांधी यांनी देशातील शेतकऱ्यांच्या व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या. त्यांनी बांगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी विशेष योगदान दिले. देशातील गरीबीचे उच्चाटन करण्यासाठी 'गरीबी हटाव' हा कार्यक्रम हाती घेतला. आपल्या देशाला प्रगती पथावर नेण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यामुळेच इ.स. १९७१ साली भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले.

## संविधान दिन






**संविधान म्हणजे काय ?**

भारताचे संविधान हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हा दस्तऐवज मुलभूत राजकीय संहिता, संरचना, कार्यपद्धती, अधिकार आणि सरकारी संस्थांची कर्तव्ये आणि मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे आणि नागरिकांची कर्तव्ये निर्धारित करणारी चौकट मांडतो.

संविधान दिन किंवा राष्ट्रीय विधी दिन हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसुदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्रांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला. त्यामुळे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

भारतीय संविधान आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ भारतीय संविधान दिन साजरा केला जातो. भारत सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १२५ वे जयंती वर्ष साजरे केले जात असताना त्यांना एक प्रकारची श्रद्धांजली वाहण्यासाठी २६ नोव्हेंबर २०१५ रोजी पहिला अधिकृत संविधान दिन साजरा केला. संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २४ नोव्हेंबर २००८ ला आदेश काढून '२६ नोव्हेंबर' हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले होते.

## महात्मा फुले पुण्यतिथी



म. जोतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. हे एक भारतीय समाजसुधारक, समाजप्रबोधक, समाजसेवक, विचारवंत, लेखक, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारी कार्यकर्ते होते. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणे, बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहाला पाठिंबा देणे हे त्यांचे मूळ उद्दिष्ट होते. फुले यांना समाजाला कुप्रथा, अंधश्रद्धेच्या पाशातून मुक्त करायचे होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिलांना शिक्षण देण्यात, महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यात घालवले. त्यांच्या याच कार्यासाठी १८८३ मध्ये त्यांना तत्कालीन ब्रिटिश भारतीय सरकारने ''स्त्री शिक्षणाचे जनक'' म्हणून गौरवले.

गरीब आणि दुर्बलांना न्याय मिळवून देण्यासाठी ज्योतिबांनी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाज' ची स्थापना केली. त्यांची समाजसेवा पाहून १८८८ मध्ये मुंबईत एका विशाल सभेत ''महात्मा'' ही पदवी बहाल करण्यात आली.

## मजेदार खेळ :-


१) घरात जितक्या डिश असतील त्या एका रांगेत ठेव व त्या प्रत्येक डीशमधून नागमोडी चाल.

२) प्रत्येक डिशवरून उड्या मारत ये.

३) प्रत्येक डिशवरून लंगडी घालत ये.

४) घरात असणारे ग्लास घे व पिरॅमीड बनव.


५) एकाच वेळी दोन्ही हातानी पेन / पेन्सिल पकड व ही कृती कर.



६) घरात फरशीवर /अंगणात २० वर्तुळ काढ. त्यावर लंगडी घाल. डाव्या/ उजव्या बाजूने उड्या मार.

७) ५ ग्लास घे. पहिला ग्लास पाण्याने भर. बाकी ४ रिकामे ठेव. एका ग्लास मधील पाणी दुसऱ्या ग्लासमध्ये ओत व ग्लास जागेवर ठेव.

८) या गोलात उड्या मारत ये.



## चिऊताई



चिऊताई चिऊताई येऊ का घरात ?
येरे बाबा कावळेदादा लवकर ये घरात
घर माझे मोडले, पावसाने सांडले
मेणाचे घर तुझे छान कसे राहिले
चिऊताई चिऊताई झोपू मी कुठे ?
झोप बाबा कावळेदादा त्या कोपऱ्यामध्ये
कुडुम कुडुम कुडुम कुडुम काय खातोस रे ?
मुंजीची सुपारी मी खातो गे
मला दे मला दे मला दे जरा,
संपली संपली जातो मी घरा...



## पेरू का खायचे ?



पेरू हे आपल्याकडे सहजच उपलब्ध होणारे फळ आहे. हिवाळ्यात पेरू सर्वत्र मिळतात. पेरूचे फळ साधारणपणे आंबा, डाळिंबाच्या फळाएवढेच असते. पेरूत खूप बिया आढळतात. पेरू हे फळ पोर्तुगीजांनी भारतात आणले, असे म्हटले जाते. पेरूच्या वेगवेगळ्या जाती आढळतात. पेरू सात्विक व बुद्धिवर्धक असतो. त्यामुळे सर्वांनी पेरू खायला हवेत. पेरू जंतुनाशक आहे. पेरूचा मुरंबाही करतात.




शिक्षक : आफ्रिकेत आढळणाऱ्या 3 प्राण्यांची नावे सांग.

चिंटू : वाघ


शिक्षक : अजून दोन नावे सांग.

चिंटू : वाघ, वाघाची आई आणि वाघाचे बाबा.

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

| ७ | डिसेंबर २०२४ | दैनंदिन उपक्रम -इ.३री<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ | कार्तिक / मार्गशीर्ष / पौष<br>शके १९४६ |
|---|---|---|---|

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | जागतिक एड्स निर्मूलन दिन  **१** तुला येत असलेल्या योगासनांचा सराव कर. | **८** ३० मिनिटात ३ अंकी संख्या घेऊन जास्तीत जास्त बेरजेची उदाहरणे सोडव. | **१५** तुला जे आवडेल ते कर. | **२२** आई-बाबा तुझ्यासाठी काय काय करतात त्याची यादी कर. | **२९** आज आकाशात चांदोबा दिसतो का ? ते उद्या सांग. |
| सो सोमवार | **२** अवयवांवरून जास्तीत जास्त म्हणी शोधून लिही. | **९** प्राणी-पक्षी यांवरून जास्तीत जास्त म्हणी शोधून लिही. | **१६** नात्यांवरून जास्तीत जास्त म्हणी शोधून लिही. | किसान दिन  **२३** किसान दिन म्हणजे काय ? | सोमवती अमावस्या **30** सकाळपासून रात्रीपर्यंत तू रोज काय करतो ते लिहून काढ. |
| मं मंगळवार | जागतिक दिव्यांग दिन  **३** दिव्यांग दिन कोणासाठी साजरा करतात ? ते लिही. | **१०** तुला जे आवडेल ते कर. | पेन्शनर्स डे  **१७** Speech 5 sentences about your school. | राष्ट्रीय ग्राहक दिन   **२४** दुकानदार व गिऱ्हाईक यातील संवाद लिही. | **३१** नवीन वर्षात तुला काय-काय शिकायला आवडेल त्याची यादी तयार कर. |
| बु बुधवार | भारतीय नौदल दिन **४** १ ते १०० संख्यांमध्ये १ आणि ० कितीवेळा येतो ते मोज. | **११** कागदी वस्तुंपासून मुखवटे बनव. | **१८** P अक्षरावरून जास्तीत जास्त शब्द तयार करून लिही. | नाताळ  **२५** नाताळ सणाचे भेटकार्ड बनव. | |
| गु गुरुवार |   **५** या स्वरांपासून ३ ते ४ अक्षरी शब्द बनव | स्वदेशी दिन **१२** स्वदेशी या शब्दाचा अर्थ काय ? शिक्षकांकडून समजून घे. | **१९** मोबाईल, घरातील टेबल, टी.व्ही, कपाट यांची लांबी-रुंदी मोज. | **२६** तुला आवडणारी गाणी/गोष्टी वर्गात बोलून दाखव. | |
| शु शुक्रवार | महापरिनिर्वाण दिन  **६** महापरिनिर्वाण दिन असे का म्हटले असावे ? माहिती करून घे. | **१३** तुला ज्या वस्तू दिसतील त्या उलट्या क्रमाने लिही. उदा. - वाटी - टीवा | संत गाडगेबाबा पुण्यतिथी  **२०** आज सर्वांनी मिळून वर्गाची स्वच्छता करूया. | **२७** मी सरपंच झाले/झालो तर... १० ओळी लिही. | |
| श शनिवार | ध्वजदिन **७** ध्वजदिन ७ डिसेंबरलाच साजरा का करतात ? माहिती मिळव. | दत्त जयंती  **१४** गुरु म्हणजे काय? अर्थ जाणून घे. | **२१** मोठ्यांच्या मदतीने भेळ बनवून खा. | **२८** इंग्रजी मधील यमक जुळणारे शब्द शोधून लिही. | |

## अभिमान आमचा



मंथन गुरुनाथ खरखर

मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत केंद्रस्तरावर १ ला भारत टॅलेंट सर्च राज्यात ९ वा इ. २री जि.प. शाळा कांबा



भूमिका भास्कर भगत

मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत महाराष्ट्र राज्यात ५वी ठाणे -पालघर जिल्ह्यात २री इ. दुसरी जि.प. शाळा घोटसई

आनंद-तरंग
खिडकी म्हणजे आकाश नसतं

डिसेंबर २०२४
कार्तिक / मार्गशीर्ष शके १९४६

## जागतिक दिव्यांग दिन




हा दिवस दरवर्षी ३ डिसेंबर १९९२ पासून जगभरात साजरा केला जातो. दिव्यांग लोकांना त्यांच्या हक्कांविषयी सांगणे आणि इतर लोकांना त्याची जाणीव करून देणे हा त्याचा उद्देश आहे.

जगभरातील एकूण दिव्यांगांमध्ये लहान मुलांची संख्या १०० दशलक्षाहून अधिक आहे. आरोग्य, सामाजिक आणि आर्थिक यांसारख्या जागतिक समस्यांचा मोठा परिणाम दिव्यांग लोकांवर होत असतो. म्हणूनच जगाला त्यांच्या समस्यांबद्दल जागरूक करण्यासाठी आणि त्यांच्यासाठी समाजात पूरक वातावरण निर्मिती करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

## मराठी शब्दकोडे

मो
त र
रा

## महापरिनिर्वाण दिन




## हत्ती



हत्ती, वाघ, सिंह, हरिण, चित्ता, कोल्हा, उंट, जिराफ असे कितीतरी प्राणी या जगात आहेत. या सर्व प्राण्यांमध्ये जिराफ हा अतिशय उंच प्राणी आहे. तर हत्ती हा खूप मोठा व बलवान प्राणी आहे. हा प्राणी आकाराने व वजनाने खूप मोठा असतो. हत्तीचे कान लांबलचक सुपासारखे असतात. तर पाय जाड असतात. त्याला एक लांब सोंड असते. हत्ती बलवान असल्यामुळे जड ओझी वाहू शकतो. हत्ती कळप करून राहतो. पूर्वी हत्तीचा उपयोग लढाईसाठी होत असे. हत्तीला पाण्यात डुंबावयास फार आवडते. हत्तीला 'गज' असेही म्हणतात.

## शेतकऱ्यांची अवजारे



शेतकरी शेतात काम करतात. धान्य पिकवतात. शेतात चांगले धान्य पिकण्यासाठी शेतीची खूप मशागत करावी लागते. शेतातील प्रत्येक काम खूप कष्टाचे असते. उन्हाळ्यात शेतकरी शेत नांगरतात. शेत नांगरण्यासाठी शेतकऱ्यांना नांगराचा उपयोग होतो. पावसाळ्याच्या सुरुवातीला शेत पेरणीसाठी तयार ठेवायचे असते. शेतातील मातीची ढेकळे लहान करायची असतात. कुळवाच्या मदतीने शेतकरी शेतात कुळवणी करतात. पाऊस पडल्यानंतर पेरणीसाठी पाबर नावाचे आवजार वापरले जाते. पिके वाढल्यानंतर शेतातील तण काढण्यासाठी खुरपे किंवा तण काढण्याचे यंत्र वापरले जाते. पिकांच्या कापणीसाठी विळ्याचा उपयोग केला जातो. कणसांच्या मळणीसाठी हल्ली मळणी यंत्राचा उपयोग केला जातो. बैलगाडी साहित्याच्या, अवजारांच्या, धान्याच्या वाहतुकीसाठी उपयोगी पडते. हल्ली नांगरणी व इतर कामांसाठी ट्रॅक्टरचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.



## मुंगीकडे बघा !



मुंगी हा एक लहानसा कीटक आहे. मुंगी हा कीटक सगळीकडे आढळतो. मुंगी हा कीटक संघटना करून राहतो. मुंगी हा सामुदायिक जीवन जगणारा प्राणी आहे. मुंग्यांची रांगच आढळते. मुंग्या अहोरात्र आपले नेमून दिलेले काम करताना आढळतात. मुंग्या आपल्या सहकाऱ्यांशी न भांडता समंजसपणे स्वत:साठी व आपल्या सहकाऱ्यांसाठी कामे करीत असतात. एखादा मार्ग बंद झाल्यास मुंग्या अडून थांबत नाहीत. त्या दुसरा मार्ग शोधून आपले काम सुरु करतात. मुंग्या सर्वांसाठीच निवारा तयार करतात. सर्वांसाठीच अन्न मिलवून साठवितात. मुंग्यांकडे आळस, स्वार्थ, कामचुकारपणा हे गुण आढळत नाहीत. मुंग्यांकडे पाहून आपल्याला खूप काही चांगल्या गोष्टी शिकता येतात.

## संत गाडगेबाबा



संत गाडगेबाबा यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील दर्यापुर तालुक्यातील शेंडगाव येथे २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. संत गाडगे महाराजांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. वयाच्या २९ व्या वर्षी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. ते एक प्रवासी सामाजिक शिक्षक होते. पायात फाटलेल्या चप्पल आणि डोक्यावर मातीची खापर घेऊन ते पायी प्रवास करायचे. गावात प्रवेश केल्यावर स्वत: साफसफाई करायचे व गाव स्वच्छ केल्याबद्दल लोकांचे अभिनंदन करायचे.

संत गाडगे बाबांनी समाजामध्ये फार मोठ्या प्रमाणात काम केले. ते एक महान तत्त्वज्ञानी, द्रष्टे, समाज सुधारक, प्रबोधनकार होते. त्यांनी वाईट चालीरिती, परंपरा, रुढी बंद कराव्या, शिक्षणाचे महत्त्व, अंधश्रद्धा निर्मूलन, हुंडा प्रथा बंद व्हावी याबाबतचे प्रबोधन किर्तनातून लोकांपर्यंत पोहोचवले.








## गुरु ने दिला...




गुरु ने दिला ज्ञानरुपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा ।।धृ।।
पिता-बंधु-स्नेही तुम्ही माउली
तुम्ही कल्पवृक्षातली सावली
तुम्ही सूर्य आम्हां दिला कवडसा ।।१।।
जिथे काल अंकुर बीजावले
तिथे आज वेलीवरी ही फुले
फलद्रुप हा वृक्ष व्हावा तसा ।।२।।
शिकू धीरता-शूरता-वीरता
धरू थोर विद्येसवे नम्रता
मनी ध्यास हा एक लागो असा ।।३।।




मुलगा : बाबा, मला तबला घेऊन द्या ना !
बाबा : मुळीच नाही. तू घरच्यांना त्रास देशील.
मुलगा : नाही देणार बाबा. सगळे झोपले की मग मी तबला वाजवेन

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग



| ८ | जानेवारी २०२५ | दैनंदिन उपक्रम -इ.३री<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ | पौष / माघ शके १९४६ |
|---|---|---|---|

## अभिमान आमचा



**ईश्वरी दामोदर धोरडे**
गायन
इ. ४ थी
जि.प. शाळा कोळींब



**ज्ञानेश्वरी विकास भोईर**
मंथन प्रज्ञाशोध परीक्षा २०२४
राज्यात २१ वी
इ.१ ली जि.प. शाळा केळणी

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र – रविवार | | **५**<br>तुला जे आवडेल ते कर. | स्वामी विवेकानंद जयंती<br>राष्ट्रीय युवा दिवस<br>**१२**<br>राष्ट्रीय युवा दिवस का म्हणतात? शिक्षकांकडून जाणून घे. | **१९**<br>११ ते २० पर्यंत पाढे पाठ कर | प्रजासत्ताक दिन<br>**२६**<br>प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन यातील फरक जाणून घे. |
| सो – सोमवार | | **६**<br>'My Self' Write Five Sentences | भोगी<br>**१३**<br>आजच्या दिवशी सर्व भाज्या एकत्र करून का खातात ? जाणून घे. | **२०**<br>३० मिनिटात जास्तीत जास्त ३ अंकी संख्येची बेरजेची उदाहरणे सोडव. | **२७**<br>तुला जे आवडेल ते कर. |
| मं – मंगळवार | | **७**<br>Write the names of 5 Colours & Shapes | मकर संक्रांत<br>**१४**<br>संक्रांतीला तिळगुळ का खातात ? का वाटतात ? ते जाणून घे. | **२१**<br>आईस्क्रीमच्या काडीपासून एक वस्तू बनव. | **२८**<br>१ मिनिटात जास्तीत जास्त किती दोरीउड्या मारशील? कृती कर व मोज. |
| बु – बुधवार | नवीन वर्ष<br>**१**<br>नवीन वर्षाचा संकल्प कर. भेट कार्ड तयार कर. | **८**<br>बोटाच्या ठशाने तुला आवडेल असे चित्र काढ. | कर / क्रिक्रांत<br>**१५**<br>आज तिळगुळ का वाटत नसावे ? जाणून घे. | **२२**<br>१०० रुपयांचे सुट्टे आईला किती प्रकारे देऊ शकतो ? मांडणी कर. | **२९**<br>आवडणाऱ्या वस्तूचे नाव लिही आणि शब्द डोंगर तयार कर. |
| गु – गुरुवार | **२**<br>क्रांतिकारक म्हणजे काय ? त्यांच्या नावाची यादी तयार कर. | **९**<br>१६ व १७ चा पाढा तयार कर. | **१६**<br>योगासनांमध्ये प्राणायामला खूप महत्त्व आहे. शिक्षकांकडून जाणून घे. | नेताजी सुभाषचंद्र जयंती<br>**२३**<br>तुम मुझे खून दो… ह्या घोषवाक्याचा प्रसंग शिक्षकांना . विचारुन जाणून घे. | म. गांधी पुण्यतिथी<br>हुतात्मा दिन<br>**३०**<br>हुतात्मा दिनाबाबत शिक्षकांकडून समजून घे. |
| शु – शुक्रवार | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती<br>बालिका दिवस<br>**३**<br>आजचा दिवस बालिका दिवस म्हणून का साजरा करतो ? ते शिक्षकांकडून जाणून घे. | विश्व हिंदी दिन<br>**१०**<br>आज हिंदीमध्ये बोलू या / वाचू या | **१७**<br>तुला येत असलेल्या पाढ्यांपासून ३० मिनिटांत जास्तीत जास्त गुणाकाराची उदाहरणे सोडव. | **२४**<br>Write 5 sentences on `My Best Friend' | **३१**<br>तुला जे आवडेल ते कर. |
| श – शनिवार | **४**<br>आई सकाळपासून काय काय काम करते त्याची यादी तयार कर. | **११**<br>Write the name of 5 Flowers and Fruits | **१८**<br>घोटीव कागदापासून सुबक नक्षीकाम कर. | **२५**<br>कोणतीही वस्तू घे तिचे नाव, रंग, आकार, उपयोग सांग / लिही. | |

आनंद-तरंग
आळस हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे.



## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले



| | |
|---|---|
| टोपणनाव : | ज्ञानज्योती, क्रांतिज्योती |
| जन्म : | ३ जानेवारी, इ.स. १८३१ नायगाव, सातारा, महाराष्ट्र |
| मृत्यू : | मार्च १०, इ.स. १८९७ पुणे, महाराष्ट्र |
| चळवळ : | मुलींची पहिली शाळा सुरु करणे |
| संघटना : | सत्यशोधक समाज |
| प्रमुख स्मारके : | जन्मभूमी नायगाव |
| वडील : | खंडोजी नेवसे (पाटील) |
| आई : | लक्ष्मीबाई नेवसे |
| पती : | जोतीराव फुले |
| अपत्ये : | यशवंत फुले |

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. त्या एक लेखिका देखील होत्या. त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले आहे. इ.स.१८९७ मध्ये प्लेगची साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले. या प्रक्रियेत सावित्रीबाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

३ जानेवारी हा सावित्रीबाई जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. १० मार्च १९९८ रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. २०१५ मध्ये, पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले. ३ जानेवारी, २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या १८६ व्या जन्मदिनानिमित्त गूगल डूडल प्रसिद्ध करून गूगलने त्यांना अभिवादन केले.

## बलिदान दिन



कर्जत तालुक्यात वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या मार्गदर्शनाखाली 'आझाद दस्ता' ही क्रांतिकारी चळवळ देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाली होती. या लढ्यातील अग्रस्थानी असलेले आगरी समाजातील नेरळ येथील हुतात्मा वीर हिराजी गोमाजी पाटील ज्यांनी ब्रिटीश सरकारला सळो की पळो करून सोडले होते. प्रत्येकवेळी ठावठिकाणा बदलत असल्याने त्यांना पकडण्यात ब्रिटीश सरकार अपयशी ठरत होते. परंतु फितुरीने त्यांचा घात केला आणि सिद्धगड येथे ब्रिटीशांच्या गोळीबारात वीर भाई कोतवाल ह्यांच्यासोबत वीर हिराजी गोमाजी पाटील ह्यांना हौतात्म्य आले. या दोन्ही हुतात्म्यांच्या बलिदानदिनी प्रामुख्याने कर्जत आणि मुरबाड या तालुक्यात मोठ्या प्रमाणात देशभक्तिपर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.


## मकर संक्रांती


आपल्या महाराष्ट्रा मकर संक्रांत हा सण अतिशय उत्साहाने साजरा करतात. मकर संक्रांत हा सण कायम १४ जानेवारीलाच येतो. (कधी तरी हा सण १५ जानेवारीला आल्याचे आपण पाहतो.) पौष महिन्यात जेव्हा सूर्य मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा हा उत्सव सर्वत्र संपन्न करण्याची परंपरा आहे. सुवासिनी या दिवसांमध्ये हळदी-कुंकवाचे आयोजन करतात. मकर संक्रांतीला काळे कपडे घालण्याची प्रथा आहे. तिळगुळ घ्या गोड गोड बोला असं म्हणण्याची संधी आपल्याला केवळ या सणालाच मिळते बरं का !

तिळ आणि गुळ हे उष्ण असल्याने या थंडीच्या मोसमात आपल्या शरीरात आवश्यक उष्णतेची गरज तिळगुळ पूर्ण करतात. याशिवाय वडीलधाऱ्या माणसांसोबत मित्रमंडळींबरोबर पतंग उडवण्याचा महोत्सव देखील आयोजित केला जातो.पतंग उडवण्याचे शास्त्रीय कारण पाहिल्यास आपल्याला सहज लक्षात येईल की थंडीच्या दिवसांमध्ये सूर्याच्या सान्निध्यात वेळ घालवण्याकरीता पतंगापेक्षा चांगले कारण कोणतेही असू शकत नाही. आणि म्हणूनच मकरसंक्रांतीला पतंग उडवण्याची परंपरा सुरु झाली असावी.



## मराठी शब्दकोडे







प्रजासत्ताक दिन हा आपल्या देशाच्या तीन राष्ट्रीय सणांपैकी एक आहे. हा दिवस आपल्याला प्रजासत्ताकाचे महत्त्व पटवून देतो. त्यामुळेच हा सण देशभरात मोठ्या आनंदाने आणि उत्साहात साजरा केला जातो.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. तरीही आपल्या देशात ठोस संविधानाचा अभाव होता. शिवाय, भारताकडे राज्याचे कामकाज सुरळीतपणे चालविण्यास मदत करणारे कोणतेही तज्ञ आणि राजकिय अधिकार नव्हते. म्हणून एक विशेष राज्य घटना तयार करण्याची नितांत गरज होती, ज्यामध्ये भारताच्या सर्व गोष्टी प्रतिबिंबीत होतील. ही लोकशाहीसाठी तयार करण्यात आलेली राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आली याच कारणास्तव आपण या दिवसाला प्रजासत्ताक दिन असे म्हणतो. आपला भारत देश हे एक मोठे लोकशाही राज्य आहे. लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी आणि लोकांसाठी चालवलेले राज्य.

## नेताजी सुभाषचंद्र बोस



१. सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी बंगाल प्रांतात झाला.
२. सुभाषबाबू १९२० मध्ये आय.सी.आय. परीक्षा उत्तीर्ण झाले.
३. सुभाषबाबू १९३८ हरीपुर व १९३९ त्रिपुरा कॉंग्रेसचे अध्यक्ष होते.
४. नेताजींनी १९४० मध्ये फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली.
५. डिसेंबर १९४० मध्ये सुभाष बाबूंना नजरकैदेत ठेवण्यात आले.
६. जानेवारी १९४१ मध्ये सुभाषबाबूंनी इंग्रजांच्या कैदेतून पलायन केले व पेशावर मास्कोमार्गे त्यांनी जर्मनी गाठली.
७. नजर कैदेतून सुटल्यावर नेताजींनी झियाउद्दीन हे नाव धारण केले होते.
८. नेताजींनी २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूर येथे स्वतंत्र हिंदूस्थानचे हंगामी सरकार स्थापन केले.
९. सिंगापूर येथे रासबिहारी बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली होती. त्याचे सेनापतीपद (नेतृत्व) नेताजीकडे आले.
१०. १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान अपघातात तैपेई विमानतळाजवळ नेताजींचे निधन झाल्याचे मानण्यात येते.

## तुम्हाला कधी हे समजायच हो...

तुम्हाला कधी हे समजायचं हो
तुम्हाला कधी हे समजायचं ।।धृ।।
विहिरी वरती पाण्याला जाता (२)
तेथेच आपली भांडी घासता (२)
पाण्यात जंतू पसरायचे हो ।।१।।
तुम्हाला कधी हे.....
माती चिखलात रोज रोज खेळता
हात न धुता जेवायला बसता
पोटात जंतू पसरायचे हो ।।२।।
तुम्हाला कधी हे.....
पान-तंबाखू, गुटखा खाता
इकडून तिकडून पचकन थुंकता
हवेत जंतू पसरायचे हो ।।३।।
तुम्हाला कधी हे.....
उघड्यावरती शौचाला बसता
सर्वदूर दुर्गंधी करता
साथीचे रोग पसरायचे हो ।।४।।
तुम्हाला कधी हे.....

## कलाकृती

(चला मुद्राचित्र करुया)



(टीप : अशाप्रकारे विविध वस्तुंचा वापर करून मुद्राचित्र तयार करा)




एक प्रवासी : तुमच्या गावात कोणी मोठा माणूस जन्मला आहे काय ?

मुलगा : नाही. आमच्या गावात सारी लहान मुलेच जन्मतात. मग ती मोठी होतात.

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

| १ | फेब्रुवारी २०२५ | दैनंदिन उपक्रम -इ.३री<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ | माघ / फाल्गुन शके १९४६ |
|---|---|---|---|

## अभिमान आमचा



**सर्वज्ञ संजय होन्याळकर**
नवोदय परीक्षा - ९६.२५/१००
पूर्व उच्च प्राथमिक
शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण
जि.प. शाळा सोनारपाडा



**तन्वी शाम पाटील**
पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती
परीक्षा उत्तीर्ण
इ.५वी जि.प. शाळा हेदुटणे



**रुदया जयवंत कोर**
मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत
राज्यात ५२ वा क्रमांक
इ.३री जि.प. शाळा मामणोली

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | **२**<br>गणपतीला बुद्धिची देवता का म्हणतात ? जाणून घे. | **९**<br>तुला जे आवडेल ते कर. | **१६**<br>तुला जे आवडेल ते कर. | संत गाडगेबाबा जयंती<br>**२३**<br>संत गाडगेबाबांचे पाच विचार ऐक व लिही. |
| सो सोमवार | | **३**<br>आज जेवणानंतर शतपावली कर व शतपावली म्हणजे काय? शिक्षकांकडून जाणून घे. | **१०**<br>कवितेतील धृवपद आणि कडवे यातील फरक शोध. | **१७**<br>छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल तुला आवडलेली गोष्ट लिही व सांग. | जागतिक मुद्रण दिन<br>**२४**<br>जागतिक मुद्रण दिन म्हणजे काय ? ते शिक्षकांकडून जाणून घे |
| मं मंगळवार | | जागतिक कर्करोग (कॅन्सर) दिवस<br>**४**<br>कॅन्सर पसरण्यामागचे कारण जाणून घेणे. | **११**<br>ठिपक्याची रांगोळी काढावयास शिकून घे. | **१८**<br>छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे ऐक व माहिती घे. | **२५**<br>Opposite words: Read and Write |
| बु बुधवार | | मौखिक आरोग्य दिन<br>**५**<br>मौखिक आरोग्य दिन याविषयी शिक्षकांना विचारुन घे. | गुरु रविदास जयंती<br>**१२**<br>21 to 50 spelling read and write | छत्रपती शिवाजी महाराज जयंती<br>**१९**<br>छत्रपती शिवाजी महाराजांची माहिती सांग. | महाशिवरात्री<br>**२६**<br>आजच्या दिवशी तू काय काय केले ते लिही. |
| गु गुरुवार | | **६**<br>जमिनीवर चालणाऱ्या वाहनांची जास्तीत जास्त नावे लिही. | **१३**<br>शब्दात 'ऋ' असणारे जास्तीत जास्त शब्द शोध व लिही. | **२०**<br>Rhyming words: Read and write. | मराठी भाषा गौरव दिन<br>**२७**<br>मराठी भाषा गौरव दिन आजच्या दिवशी का साजरा करतात ? |
| शु शुक्रवार | | **७**<br>आकाशात चालणाऱ्या वाहनांची नावे लिही. | **१४**<br>वाटाणा-फुटाणा-शेंगदाणा एकत्र (वाटीभर) करून पुन्हा वेगळे कर. | जागतिक मातृभाषा दिन<br>**२१**<br>एकमेकांच्या मातृभाषेचा आदर करण्यामागील हेतू समजून घे. | राष्ट्रीय विज्ञान दिन<br>**२८**<br>तुला जे आवडेल ते कर. |
| श शनिवार | माघी गणपती<br>राष्ट्रीय तट रक्षक दिन<br>**१**<br>राष्ट्रीय तट रक्षक दिनाची माहिती मिळव. | **८**<br>कोणतेही एक पुस्तक घे, त्यातील उलट उकाराचे शब्द शोधून लिही / वाच. उदा. कृपया | **१५**<br>छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरण संबंधीचे लिहिलेले पत्र वाच व सुंदर अक्षरात लिही. | **२२**<br>तुझ्या शाळेतील / घरातील कुंडी सजव. | |



## छत्रपती शिवाजी महाराज
## शिवजयंती

ज्यांचे नाव घेतल्यावर अभिमानाने छाती फुगते आणि मरणाच्या दारात उभ्या असलेल्यांना बारा हत्तीचे बळ संचारते, अशा छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांच्या आईचे नांव जिजाऊ तर वडीलांचे नाव शहाजी राजे होते. जिजाऊंनी त्यांना रामाच्या, कृष्णाच्या व अर्जुनाच्या गोष्टी सांगितल्या. लहान वयातच शिवबांनी आपल्या मावळ्यांसह रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा केली. तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाही, निजामशाही व मुघल बादशहाशी लढा देऊन आपले हिंदवी स्वराज्य वाढवले. सुलतानशाही, मुघल या क्रूर सत्तेला गाडून टाकून अफजल खानाचा वध शाहिस्ते खानाची फजिती, आग्र्याहून सुटका असे एक ना अनेक प्रसंग आहेत, ज्यातून छत्रपती शिवाजी महाराजांनी यशाची पताका कायम ठेवली.



२१ फेब्रुवारी

## आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस

जगभरात बोलल्या जाणाऱ्या प्रमुख भाषांमध्ये हिंदी, इंग्रजी, बंगाली, मराठी, पंजाबी, अरबी, जपानी, रशियन, पोर्तुगीज आणि स्पॅनिश इ. अनेक भाषांचा समावेश आहे. जगातील विविध भाषा आणि सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि मातृभाषांबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २१ फेब्रुवारीला आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन साजरा केला जातो.


भाषा हा संवादाचा पाया आहे. प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी एकमेकांच्या भाषेचा आदर व स्विकार करणे आणि समजून घेणे महत्त्वाचे असते. तरच जग जवळ येईल.




मराठी भाषा गौरव दिन हा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्म दिवशी साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञान भाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले गेले आहेत. मातृभाषेचा गौरव म्हणून व कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून त्यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

अनेक वेळा सर्वसामान्य माणसाकडून मराठी भाषा गौरव दिन आणि मराठी भाषा दिवस याची गफलत केली जाते. मराठी भाषा गौरव दिवस (२७ फेब्रुवारी) आणि मराठी राज भाषा दिवस (१ मे) हे स्वतंत्र दिवस असून या दिवसाचे स्वतंत्र असे महत्त्व आहे.

१ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र हे विशेषत: मराठी भाषिकांचे राज्य असल्याने १ मे दिवस हा मराठी राजभाषा दिन किंवा मराठी भाषा दिन म्हणून सन १९६५ पासून साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय वसंतराव नाईक सरकारने केला. 'महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल' असे जाहीर केले.





२८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय भौतिक शास्त्रज्ञ, सर चंद्रशेखर व्यंकट रमण यांनी 'रमण इफेक्टचा' शोध लावला तेव्हापासून २८ फेब्रुवारी हा दिवस भारतामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल, समाजात जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी

१)राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषद

२) विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो.

## डोके चालवा




सारख्या अक्षरांच्या जोड्या लावा. पण जोड्या लावताना कोणतीही रेष एकमेकांना स्पर्श करणार नाही याची काळजी घ्या.

## कलाकृती





## घंटा झाली टन टन टन





घंटा झाली टन टन टन
शाळा सुटली हुं हुं हुं
घंटा झाली, शाळा सुटली
दप्तर पाठीवर घ्यायचं
रस्त्याच्या कडेने चालायचं गड्या...२
डिंग डांग डिंग डांग डिंगाक ।।धृ।।

इकडून मोटार, तिकडून मोटार
मध्येच रिक्षा येते
रिक्षा मागून मोटर सायकल
धक्का देऊन जाते
या धक्क्याने आम्हा मुलांचं
छोटसं फॅक्चर व्हायचं
रस्त्याच्या कडेने चालायचं गड्या...२
डिंग डांग डिंग डांग डिंगाक ।।१।।

रस्ता ओलांडण्यापूर्वी उजवीकडे पाहू
अर्धा रस्ता ओलांडल्यावर डावीकडे पाहू
उजवा डावा - डावा उजवा
करीत शाळेत जायचं
रस्त्याच्या कडेने चालायचं गड्या...२
डिंग डांग डिंग डांग डिंगाक ।।२।।

कुणी कुणाशी भांडायचं नाही
कुणी कुणाला ढकलायचं नाही
हसत खेळत गप्पा मारत
रोजच शाळेत जायचं
रस्त्याच्या कडेने चालायचं गड्या...२
डिंग डांग डिंग डांग डिंगाक ।।३।।






मुलगा : बाबा मी आज शाळेत जाणार नाही.
बाबा : का रे बाळा...
मुलगा : काल गुरुजी म्हणाले ४ + १ = ५ आणि
आज म्हणाले ३ + २ = ५ मग
नक्की मला समजेना
४ + १ = ५ की ३ + २ = ५ ....हा-हा

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

१० | **मार्च २०२५** | दैनंदिन उपक्रम -इ.३री, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ | फाल्गुन / चैत्र शके १९४६-४७

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | गुढीपाडवा<br>**३०**<br>आजच्या दिवशी गुढी का उभारतात ते जाणून घे. | **२**<br>जास्तीत जास्त हातच्याची बेरजेची उदाहरणे सोडव. | **९**<br>लिंबू सरबत बनवून पी आणि कसे वाटते ते पाच ओळीत लिही. | राष्ट्रीय लसीकरण दिन<br>**१६**<br>लसीकरणाचा अर्थ शिक्षकांकडून जाणून घे. | जागतिक हवामान दिन<br>**२३**<br>मूठभर शेंगदाणे घे आणि English मधून मोज. |
| सो सोमवार | रमजान ईद<br>**३१**<br>शेवटी 'क्ष' अक्षरे येणारे जास्तीत-जास्त शब्द लिही. | जागतिक वन्यजीव दिन<br>**३**<br>'जागतिक वन्यजीव दिन' का साजरा करतात ? यामागील विचार जाणून घे. | सावित्रीबाई फुले पुण्यदिन<br>**१०**<br>पुण्यतिथी, पुण्यदिन, जयंती, स्मृतिदिन याचा अर्थ जाणून घे. | **१७**<br>(भौमितिक आकार) पट्टी व बांगडीचा वापर करून काढ. | जागतिक क्षयरोग दिन<br>**२४**<br>क्षयरोगाविषयी माहिती जाणून घे. |
| मं मंगळवार | | **४**<br>सुविचार वाच व आवडीचे दोन पाठ कर व अर्थ जाणून घे. | छ. संभाजी महाराज बलिदान दिन<br>**११**<br>छत्रपती संभाजी राजांबद्दल माहिती वाच | **१८**<br>तुला जमेल तसे संख्या, आकार, पाने, फुले घेऊन आकृतीबंध तयार कर. | **२५**<br>शिक्षकांकडून सूर्यनमस्कार शिकून घे, व रोज पाच सूर्यनमस्कार घालायला सुरूवात कर |
| बु बुधवार | | **५**<br>'प्र', 'क्र', 'द्र' अक्षरे असणाऱ्या शब्दांची जास्तीत जास्त यादी कर. | **१२**<br>I like banana या प्रमाणे I like --------- चे जास्तीत जास्त वाक्य बनव. | रंगपंचमी<br>**१९**<br>नैसर्गिक रंग घेऊन, रंगपंचमी साजरी कर. | **२६**<br>ऋतुंची नावे लिही. |
| गु गुरुवार | | **६**<br>This is a ball या प्रमाणे This is a............ चे जास्तीत जास्त वाक्ये बनव. | होळी<br>**१३**<br>तू होळी कशी साजरी करतोस ते लिही. | पतेती<br>**२०**<br>मराठी व इंग्रजी महिन्यांची नावे लिही. | **२७**<br>I want pen याप्रमाणे I want -----. चे जास्तीत जास्त वाक्ये बनव. |
| शु शुक्रवार | | **७**<br>तुला जे आवडेल ते कर. | धुलिवंदन<br>**१४**<br>होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलिवंदन का साजरी करतात? | जागतिक वन दिन<br>**२१**<br>एक रोपटे लावून त्याचे उपयोग लिही. त्याला तुझे नाव देवून संवर्धन कर. | **२८**<br>तुला जे आवडेल ते कर. |
| श शनिवार | **१**<br>शब्दात 'त्र/त्रा/त्री...' येणारी अक्षरे शोधून लिही व वाच. | आंतरराष्ट्रीय महिला दिन<br>**८**<br>महिला दिवस साजरा का करत असावेत यामागील इतिहास जाणून घे | जागतिक ग्राहक दिन<br>**१५**<br>ग्राहक म्हणजे काय? शिक्षकांकडून समजून घे. | जागतिक जल दिन<br>**२२**<br>पाण्याचे स्त्रोत शिक्षकांकडून समजावून घे. | **२९**<br>चला सागर गोटे किंवा इतर बैठे खेळ खेळुया |

## अभिमान आमचा



**कुमार रंजित शेलार**
तबला वादक
इ.७ वी,
जि.प. शाळा नांदप



**श्रावणी संजय कोर**
मंथन प्रज्ञाशोध
परीक्षेत राज्यात ४१ वा क्रमांक
इ.२री जि.प. शाळा मामणोली

## होळी / धुलिवंदन



फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण भारतामध्ये विशेषत: उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. होळी हा रंगांचा सण आहे. वेगवेगळ्या प्रांतात याला वेगवेगळ्या नावांनी संबोधीले जाते. जसे की, होलिकादहन, होळी, शिमगा, हुताशनी महोत्सव, होलिकोत्सव. कोकणात याला 'शिमगो' असेही म्हणतात. घरोघरी पालखी नाचवून होळी हा सण अतिशय आनंदाने साजरा केला जातो.

महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळण्यात येतात आणि पेटलेल्या होळीभोवती बोंबा मारत लोकं प्रदक्षिणा घालतात. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची रीत आहे. होळी नंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. या दिवशी होळीची रक्षा अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळण घेतली जाते. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पाहिले जाते.



भारतातील शेतकरी वर्गात होळी या सणाचे खास महत्त्व आहे. या दिवशी हाती आलेल्या पिकाबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते म्हणून होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हांच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे.



| | |
|---|---|
| जन्मतारीख : | १४ मे १६५७ |
| जन्मस्थळ : | पुरंदर किल्ला |
| मृत्यूची तारीख : | ११ मार्च १६८९ |
| मृत्यूस्थळ : | तुळापूर |
| पुस्तके : | बुधभूषण, नखशिख, नायिकाभेद, सातसतक |

## छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिवस

छत्रपती शिवाजी महाराज आणि सईबाई यांच्या पोटी संभाजीराजे भोसले यांचा जन्म १४ मे १६५७ रोजी झाला. छत्रपती संभाजी महाराजांनी मोगल, सिद्धी, पोर्तुगीज अशा अनेक परकीय सत्तांशी अखंड संघर्ष केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या स्वराज्याच्या पाया भरणीवर, छत्रपती संभाजी महाराजांनी कळस चढविला. मराठा साम्राज्यापेक्षा पंधरा पट मोठे असणाऱ्या मोगल साम्राज्याला छत्रपती संभाजी महाराजांनी जेरीस आणले. त्यांनी अनेक लढाया केल्या. संभाजीराजे त्यांच्या कारकिर्दीत २०१ लढाया लढले. यापैकी एकाही लढाईत त्यांचा पराभव झालेला नाही. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी सर्वस्व अर्पण केले. स्वराज्य आणि स्वधर्म प्रेमाचा आदर्श घालून दिला.

संभाजीराजे २३ व्या वर्षी छत्रपती झाले. शत्रूच्या तावडीत सापडल्यानंतर अनेक हालअपेष्टा होऊनही त्यांनी शरणागती पत्करली नाही. त्यांचे हे शौर्य अजरामर झाले म्हणून त्यांच्या पुण्यतिथीचा दिवस बलिदान दिन म्हणूनही साजरा केला जातो.



## जागतिक ग्राहक दिन

दरवर्षी १५ मार्च हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक ग्राहक हक्क दिन राष्ट्राध्यक्ष जॉन एफ् केनेडी यांच्याकडून प्रेरीत झाले आहे. ज्यामध्ये त्यांनी औपचारिकपणे ग्राहक हक्कांच्या मुद्याला संबोधित केले. हा दिवस सर्व ग्राहकांच्या मुलभूत हक्कांना प्रोत्साहन देण्याच्या आणि त्या हक्कांचा आदराने संरक्षण करण्यासाठी प्रोत्साहीत करण्याची संधी आहे.

१९८३ मध्ये पहिल्यांदा साजरा करण्यात आलेला जागतिक ग्राहक हक्क दिन हा ग्राहक जागरुकता वाढविण्यासाठी महत्त्वाचा कार्यक्रम बनला आहे.




महाराष्ट्रात चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या प्रतिपदेपासून नवीन वर्षाची सुरुवात करण्याची परंपरा आहे. गुढीपाडवा प्रामुख्याने महाराष्ट्रात हिंदू नववर्षाची सुरुवात म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्रात गुढीपाडवा मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. यादिवशीचे आरोग्यासाठीही फायदेशीर असे पदार्थ नैवेद्य म्हणून तयार केले जातात. यादिवशी कडूलिंबाचे खास महत्त्व असल्याचे सांगितले जाते. यादिवशी गुढीला कडूलिंबाच्या कोवळ्या पानांची डहाळी बांधली जाते. यादिवशी गोड पक्वान्नांसोबत कडूलिंबाची पाने खाण्याचीही परंपरा आहे. कडूलिंब आरोग्याला चांगले असते, तसेच या महिन्यात भरपूर उकाडा असतो, कडूलिंब सेवन केल्याने शरीरातील उष्णता कमी होते.

शालिवाहन शकाची सुरुवात गुढीपाडव्याच्या दिवशी झाली असे मानले जाते.

## महाशिवरात्री





महाशिवरात्रीच्या दिवशी शिवलिंगाची विशेष पूजा होते. पंचगव्य म्हणजे गायीचे दूध, तूप, शेण, गोमूत्र आणि दही लावून शिवलिंगाला अभिषेक करतात. त्यानंतर दूध, दही, तूप, मध आणि साखर या पंचामृतान शिवलिंगावर लेप देतात. धोत्राचे फळ, बेलाची पाने तसेच पांढरी फुले वाहून पुजा करतात.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने भाविक उपवास करतात. काही भक्त दूध आणि फळे असा आहार करतात. प्रसादासाठी विविध प्रकारचे पदार्थ तयार करून ते शंकराला अर्पण केले जातात. खीर, पंचामृत, दूध आणि दुधापासून केलेले पदार्थ नैवेद्यासाठी तयार केले जातात.

महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. जो जीवनात आणि जगामध्ये अंधार आणि अज्ञानावर मात करण्याचे स्मरण आहे. या दिवशी शिवाचे स्मरण करतात. प्रार्थना, उपवास, नैतिकता आणि सद्गुणांचे मनन करून साजरा केला जातो. भाविक रात्रभर जागरण करतात.

## मराठी शब्दकोडे




## कलाकृती







## चांदोमामा

चांदोमामा घर तुझे लांब लांब लांब
पाय दुखतील चालुन जरा थांब थांब थांब
चालू नको असा गड्या झप झप झप
लिंबोणीच्या झाडामागे लप लप लप
लिंबोणीचे झाड आहे छान छान छान
तुझ्यासारखी आई माझी गोरी गोरी पान
चेहरा तिचा तुझ्या सारखा गोल गोल गोल
भाऊ ना रे आईचा तू बोल बोल बोल




आई : अरे बंडू, डोळे मिटून आरशापुढे का उभा आहेस ?

मुलगा : अगं आई, मी झोपलो म्हणजे कसा दिसतो, ते पहात होतो.


शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

| ११ | एप्रिल २०२५ | दैनंदिन उपक्रम -इ.३री<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ | चैत्र / वैशाख शके १९४७ |
|---|---|---|---|

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र<br>रविवार | **अभिमान आमचा**<br><br>विघ्नेश संतोष मांजरे<br>पखवाज वादन, तबला वादन<br>जि.प. शाळा गुरवली | रामनवमी<br>**६**<br>'ऑ' कार युक्त शब्द जास्तीत-जास्त शोधून लिही व वाच. | **१३**<br>प्राणी आणि त्यांचे आवाज इंग्रजी मध्ये लिही आणि वाच. | ईस्टर संडे<br>**२०**<br>प्राणवायु म्हणजे काय ? तो कोठून मिळतो, ते जाणून घे. | **२७**<br>स्माईलीचे चित्र वेगवेगळ्या प्रकारे काढून रंगव. |
| सो<br>सोमवार | | जागतिक आरोग्य दिन<br>**७**<br>आरोग्य दिन साजरा करण्यामागील हेतु समजून घे. आरोग्याची काळजी घे. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती<br>**१४**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गुरुंची नावे जाणून घे. | **२१**<br>प्रत्येक महिन्यात येणाऱ्या सणांची नावे लिही. | **२८**<br>वर्ग, कार्य याप्रमाणे रफारयुक्त जोडशब्द शोधून लिही आणि वाच. |
| मं<br>मंगळवार | एप्रिल फुल<br>**१**<br>तू आज कोणा-कोणाला एप्रिल फुल केले ? का करत असावे जाणून घे. | **८**<br>तुला जे आवडेल ते कर. | **१५**<br>मराठीतील ऋतूंना इंग्रजीमध्ये काय म्हणतात ? ते लक्षात ठेव. | वसुंधरा दिवस<br>**२२**<br>'वसुंधरा' शब्दाचे समानअर्थी शब्द शोधून लिही | **२९**<br>मातीपासून तुला आवडतील त्या विविध वस्तू बनव. |
| बु<br>बुधवार | **२**<br>एप्रिल महिन्यातील मागील पानाचे वाचन कर. | **९**<br>सूर्यग्रहण कसे होते, हे शिक्षकांकडून समजून घे. | **१६**<br>चंद्राचे विविध कला चढत्या व उतरत्या क्रमाने काढ. | जागतिक पुस्तक दिन<br>**२३**<br>शाळेतील वाचनालयातील तुझ्या आवडीचे पुस्तक वाच. | अक्षय्य तृतिया<br>**३०**<br>१ ते १०० संख्या तीनच्या टप्प्यात लिही. उदा. : १,४,७... |
| गु<br>गुरुवार | **३**<br>'अॅ' कार युक्त शब्द जास्तीत-जास्त लिही व वाच. | महावीर जयंती<br><br>**१०**<br>१ ते १०० संख्या दोनाच्या पटीत लिही. उदा. :- १,३,५,७... | **१७**<br>तुला जे आवडेल ते कर. | **२४**<br>जास्तीत जास्त पक्ष्यांची नावे शोधून लिही. | **अभिमान आमचा**<br><br>मनस्वी राजेश कोर<br>मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात ५० वा क्रमांक<br>इ.३री जि.प. शाळा मामणोली<br><br>अनुप राजाराम पाटील<br>नवोदय परीक्षा उत्तीर्ण-२०२३<br>पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण<br>इ.५वी जि.प. शाळा हेदुटणे |
| शु<br>शुक्रवार | **४**<br>प्राणी आणि त्यांच्या पिल्लांना मराठी व इंग्रजीमध्ये काय म्हणतात ते शोधून लिही. | **११**<br>कपाटातील तुझे कपडे काढून घडी घालून मोजून ठेव. | गुडफ्रायडे<br>**१८**<br>गुडफ्रायडेला अजून कोणकोणत्या नावाने ओळखला जातो ते शोधून लिही. | **२५**<br>क्या, ख्या, ग्या, घ्या यापैकी कोणतेही जोडअक्षरे घेऊन वाक्ये तयार कर. | |
| श<br>शनिवार | **५**<br>मराठीतील वारांची नावे इंग्रजीत लिही व पाठ कर. | हनुमान जयंती<br>**१२**<br>आज १२ सूर्यनमस्कार घाल पाहू. | **१९**<br>नारळाच्या करवंटीपासून तुला आवडतील त्या वस्तू बनव. | **२६**<br>तुला जे आवडेल ते कर. | |

## जागतिक पुस्तक दिन




## डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम



भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम, शेवटच्या श्वासापर्यंत ज्ञानसाधनेत मग्न होते. म्हणूनच, १५ ऑक्टोबर ही त्यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी केली जावी याला विशेष औचित्य आहे. वाचन ही अशी सिद्धी आहे की, त्यामुळे आपल्याला एका हयातीत अनेक आयुष्य जगता येतात. अनुभव विश्व व्यापक होते. जाणीवा समृद्ध होतात .जीवनाचं आणि भोवतालचं आकलन अधिक सखोल होतं. मनाची अव्याहत मशागत करणारा आणि जीवनानुभवाचे दर्शन घडवणारा पुस्तकांसारखा दुसरा गुरु नाही. भाषेचा अभिजात गोडवा आणि आशय वाचनामुळेच खोलवर पटत जातो. म्हणूनच म्हटले जाते, 'वाचाल तर वाचाल'.

चला वाचूया, स्वत:ला घडवूया !











अडगुलं मडगुलं
सोन्याचं कडगुलं
रुप्याचा वाळा
तान्ह्या बाळा
तीट टिळा

आपडी थापडी
गुळाची पापडी
धम्मक लाडू, तेल काढू
तेलंगीचे एकच पान
दोन हाती धरले कान
चाऊ माऊ, चाऊ माऊ
पितळीतले पाणी पिऊ
हंडा पाणी गडप
हंडा पाणी गडप

पापड खाल्ला कुर्रम कुर्रम
भुरकलं सांबार सर्रम सर्रम
उसळ खाल्ली अटक् मटक्
लोणचं खाल्लं चटक् चटक्
भात खाल्ला गुटू गुटू
पोळी खाल्ली मुटू मुटू
कढी प्यायली भुरुक् भुरुक्
ढेकर आला ढुरुक् ढुरुक्
चटणी खाल्ली एक बोट
आता भरलं बाळाचं पोट
बाळ हसतंय खुदुक खुदुक
डुलकी येतेय झुलुक झुलुक



करंगळी - मरंगळी
मधलं बोटं चाफेकळी
तळहात - मळहात
मनगट - कोपर
खांदा - गळागुटी - हनुवटी
भाताचं बोळकं
वासाचं नळकं
काजळाच्या डब्या
देवाजीचा पाट
देवाजीच्या पाटावर
चिमण्यांचा किलबिलाट

### हुप हुप माकडा



माकडा माकडा हुप हुप कर
चिंचेच्या झाडावर चढ लवकर
चिंचा तोडून हातात घे
त्यातल्या दोन मला दे
मीठ लावून चिंचा खावू
हुप हुप माकडा करत जावू

### वेडं कोकरु



वेडं कोकरु, खूप थकलं;
येताना घरी, वाट चुकलं !
अंधार बघून, भलतंच भ्यालं;
दमून दमून, झोपेला आलं !
शेवटी एकदा घर दिसलं;
वेडं कोकरु, गोड हसलं !
डोकं ठेवून गवताच्या उशीत
हळूच शिरलं आईच्या कुशीत !



ससा ससा दिसतो कसा
कापूस पिंजून ठेवला जसा ।
लाल-लाल डोळे छान
छोटे शेपूट मोठे कान ।
पाला खाऊन फुगतो टुम्
चाहुल लागताच पळतो धुम् ।

### केळीचे पान



असरट पसरट केळीचे पान
अनूने केला स्वयंपाक छान
काढला केर, धुतले हात
मांडला पाट, ठेवले ताट
वरण भात, लिंबाची फोड
पुरी-भाजी, श्रीखंड गोड
वाढलं ताटात, वाढलं वाटीत
बाहुली बसली, जिभल्या चाटीत
सावकाश जेवा पोटभर जेवा
पोटभर जेवून ढेकर द्या
ओऽऽऽया



कोल्हापूरचा म्हातारा शेकोटीला गेला ।।धृ।।
कोल्हापूरचा म्हातारा / म्हाताऱ्याची बायको /
बायकोचा मुलगा / मुलाची बायको /
बायकोचा कुत्रा / कुत्र्याची शेपूट /
शेपटीवरची माशी / माशीची टोपी /
शेकोटीला गेले.




आई : अरे बंडू, डोळे मिटून आरशापुढे का उभा आहेस ?

मुलगा : अगं आई, मी झोपलो म्हणजे कसा दिसतो, ते पहात होतो.

शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण

# आनंद-तरंग

| १२ | मे २०२५ | दैनंदिन उपक्रम -इ.३री<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ | वैशाख / ज्येष्ठ शके १९४७ |
|---|---|---|---|

## अभिमान आमचा



प्रशांत तानाजी देवकर
तबला वादक
इ.८ वी जि.प.शाळा मामणोली



पायल तानाजी भोईर
BTS परीक्षेमध्ये राज्यात ३री
इ.१ली जि.प. शाळा मांजर्ली


| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | लाफ्टर डे<br>**४**<br>मित्रांसोबत गोष्टीचे पुस्तके वाच. | मातृ दिवस<br>**११**<br>आई-बाबांच्या पाया पड आणि आईला कामात मदत कर. | **१८**<br>योगासनांचा सराव रोज सकाळी कर | **२५**<br>तुला जो रंग आवडतो त्या रंगाविषयी माहिती लिही |
| सो सोमवार | | **५**<br>फुलपाखराचे चित्र काढून रंगव. | बुद्धपौर्णिमा<br>परिचारिका दिवस<br>**१२**<br>परिचारिका म्हणजे काय? याची माहिती मिळव. | **१९**<br>२ ते २० पर्यंत पाढे लिही व पाठ कर | **२६**<br>इंग्रजीमधून चवींची नावे लिही |
| मं मंगळवार | | राजर्षी शाहु महराज पुण्यदिन<br>**६**<br>राजर्षी शाहु महाराज यांची माहिती मिळव आणि सुंदर अक्षरात लिही. | **१३**<br>परिसरातील बिया गोळा कर आणि त्या कोणत्या वनस्पतींच्या आहेत ते शोधून काढ. | **२०**<br>तुला जे आवडेल ते कर. | **२७**<br>तिथी म्हणजे काय? शोधून लिही व आठवणीत ठेव |
| बु बुधवार | | **७**<br>मातीपासून तुला जमतील अशा वस्तू बनव. | **१४**<br>पक्षांसाठी एका भांड्यात पाणी ठेव | **२१**<br>कोणत्याही तीन फळांची चित्रे काढून रंगव व माहिती लिही | **२८**<br>सूर्य आणि चंद्र फरक शोधून लिही |
| गु गुरुवार | महाराष्ट्र दिन<br>कामगार दिन<br>मराठी राजभाषा दिन<br>**१**<br>महाराष्ट्र दिनाचे महत्व सांग. | **८**<br>कवितांचे वाचन कर आणि आवडणारी कविता लिही. | स्वातंत्र्यदिन<br>**१५**<br>शेवटी n अक्षर येणारे शब्द जास्तीत जास्त शोधून लिही | **२२**<br>कोणतेही वर्तमान पत्र घे आणि बातम्या वाच | महाराणा प्रताप जयंती<br>**२९**<br>ग्रह आणि तारे फरक शोधून लिही |
| शु शुक्रवार | **२**<br>साठवलेले पैसे मोज व त्या पैशातून गोष्टीचे पुस्तके, चित्रकलेची वही व रंगपेटी घे. | **९**<br>१ ते ५० अंकाचे अक्षरात सुलेखन कर. | **१६**<br>पाण्याची बचत कशी करता येईल पाच वाक्ये लिही. | **२३**<br>आईसक्रिमचे चित्र काढून रंगव आणि का आवडते ते लिही | **३०**<br>तुला जे आवडेल ते कर. |
| श शनिवार | **३**<br>झाडाचे चित्र काढून, झाड आपल्याला काय देते ते लिही. | **१०**<br>५१ ते १०० अंकाचे अक्षरात सुलेखन कर. | **१७**<br>A पासून ते Z प्रत्येकाचे पाच शब्द लिही | **२४**<br>पक्षी घरटे कसे बनवितात? निरीक्षण कर, पक्ष्यांसाठी घरटे बनविण्याचा प्रयत्न कर. | विश्व तंबाखू निषेध दिवस<br>**३१**<br>तंबाखू का खाऊ नये? ते तुझ्या शब्दात लिही |

# सुट्टीत करावयाचे उपक्रम

## शब्द साखळी किंवा शब्द भेंड्या

मुलांनी एकत्र येऊन गाण्यांच्या भेंड्यांप्रमाणे शब्दांच्या भेंड्याचा खेळ खेळावा. त्यालाच शब्द साखळी असे म्हणतात.

ठिपके जोडून चौरस बनव.



BLACK PURPLE
YELLOW RED ORANGE
PURPLE BLUE RED
BLUE GREEN
YELLOW BLACK
PURPLE RED YELLOW
BLUE BLACK
GREEN GREEN
ORANGE BLUE PURPLE
BLACK RED RED

बर का मुलांनो, या खेळात रंगांचे नाव न वाचता फक्त रंग ओळखायचे आहे, ओळख बघू..!

## Sudoku Activity

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 2 | | |
| 3 | 4 | | |
| | | | |
| 4 | | 2 | 1 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 1 | | 4 |
| | | 3 | |
| 1 | | | |
| 2 | | | 3 |

(प्रत्येक ओळीत चार अंक आले पाहिजे. एक अंक दोनदा येता कामा नये.)

## शब्दातील अक्षरांवरुन वाक्ये

एखादा शब्द घेऊन तो वेगवेगळा करावा आणि प्रत्येक अक्षराचे शब्द बनवून अर्थपूर्ण वाक्य तयार करावे.
उदा. मोकाट
मो - मोहनची
का - काल
ट - टरकली



## एका वाक्यावरुन अनेक प्रश्न तयार करणे

आजी वीस तारखेला गुरुवारी मोनिका आत्याच्या घरी नाशिकला गेली.
या एका वाक्यावरुन अनेक प्रश्न तयार करतात येतात
१. आजी किती तारखेला गेली?
२. आजी कोणाकडे गेली?
३. आजी कोठे गेली?
४. मोनिका आत्याकडे कोण गेली?
५. मोनिका आत्या कोठे राहते?
६. गुरुवारी मोनिका आत्याकडे कोण येणार आहे?
७. आत्याचे नाव काय आहे?
८. आजी कोणत्या वारी आत्याकडे गेली?
९. आजी आणि मोनिका आत्याचे नाते काय आहे?
१०. गुरुवारी कोणती तारीख येते?
अशा प्रकारे तुम्हीही एक वाक्य घेऊन प्रश्न तयार करा.





बर का मुलांनो,
हात न उचलता,
रेषेवर रेष न येता
प्रत्येक लाल चांदणीला
स्पर्श करुन
हिरव्या चांदणीपर्यंत पोहोच.

## Make a Word

| T | I |
|---|---|
| R | P |

TRIP

| D | W |
|---|---|
| R | O |

______

| S | S |
|---|---|
| I | K |

______

| I | B |
|---|---|
| D | R |

______

| V | D |
|---|---|
| C | K |

______

| H | R |
|---|---|
| L | I |

______

| I | T |
|---|---|
| F | G |

______

## शब्द एक, रुपे अनेक

या उपक्रमात एक शब्द घेऊन त्या शब्दाला वेगवेगळी शब्दयोगी अवयव लावून त्या शब्दाचे अनेक रुपे करावीत.
उदा. कुत्रा - कुत्र्याला, कुत्र्यांना, कुत्राचे, कुत्र्यासाठी, कुत्र्या, कुत्र्याची, कुत्र्याकरिता, कुत्र्यामुळे, कुत्र्याचा इ. अशा प्रकारे तुम्ही शब्द घेऊन त्याची अनेक रुपे करु शकतात.

## एका शब्दावरुन पाच ते सहा वाक्य बनविणे

एक शब्द किंवा वस्तू घेणे
उदा. आपण "पेन" घेतला.
या पेनाचा रंग, उपयोग, आवड, फायदे, नसता तर हि मुद्दे घेऊन वाक्य तयार कर.
जसे,
१. हा पेन आहे
२. हा निळ्या रंगाचा पेन आहे.
३. पेन विविध रंगांचे असतात.
४. पेनाचा आकारही वेगवेगळा असतो.
५. पेनाचा उपयोग लिखाणासाठी होतो, विविध कामांसाठी, चित्र काढण्यासाठी, रंगविण्यासाठी देखील वापरतात.
६. मला हिरव्या रंगाचा पेन आवडतो.
७. पेन नसता तर लेखणाला पुरावा नसता.

## शब्दांत लपलेले अवयव शोधणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. पायरी | २. बंगाल | ३. सन्मान | ४. अपमान | ५. पोपट |
| ६. नाटक | ७. मानव | ८. दुकान | ९. पाठवणे | १०. नाकतोडा |
| ११. वेगळा | १२. बोलपट | १३. मुंगळा | १४. उपाय | १५. कानस |
| १६. भटजी | १७. तोंडली | १८. कमान | १९. पायवाट | २०. चारसत्व |

अशा प्रकारे तुम्ही शब्दात लपलेले अवयव, प्राणी, फुले यांचा शोध घ्या.